# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 159/2010

श्री समाधान शिवराम पोहरकर
संताजीनगर, धर्मराज शाळेजवळ
कांद्री (कन्हान)
ता. पारशिवनी जि.नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्रीमती सुनंदा मुश्रिफ
जन माहिती अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 1.11.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 21.5.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 1.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत. तक्रारदार यांनी तक्रार अर्जाप्रमाणे अशी तक्रार केलेली आहे की आयोगाकडील दि.15.5.2009 रोजी दिलेल्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना माहिती मिळाली नाही.

2. तक्रारदार यांनी सुनावणीत असे नमूद केलेले आहे की आयोगाकडील दि.15.5. 2009 चा आदेश जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 21.7.2000 रोजी प्राप्त झाला होता. मात्र त्यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशाप्रमाणे कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

3. विद्यमान जन माहिती अधिकारी आणि विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी सुनावणीस हजर होते. त्यांनी असे सांगितले की आयोगाकडील दि.15.5.2009 चा आदेश त्यांचे कार्यालयाकडे दि. 21.7.2009 रोजी प्राप्त झाला होता. मात्र तत्कालीन जन माहिती अधिकारी व तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. सुनावणीत असे दिसून आले की विद्यमान जन माहिती अधिकारी हे दिनांक 5.7.2010 रोजी रुजू झालेले असून विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी हे दि. 7.6.2010 रोजी रुजू झालेले आहेत. म्हणून प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की आयोगाचे दि.15.5.2009 च्या आदेशाची तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणतीही दखल घेतलेली नाही. म्हणून त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे

संयुक्तिक होईल. तथापी विद्यमान जन माहिती अधिकारी व तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तक्रारदार यांच्या दि. 3.3.2008 च्या अर्जासोबत जोडलेल्या मुद्यांची माहिती संबंधित संस्थेकडून कागदपत्रे व अभिलेख निरीक्षण करण्याकरीता उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्याबाबअत संमती दिली. म्हणून तक्रारदार यांचा तक्रार अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार मंजुर करण्यात येत असून दि. 3.3.2008 च्या अर्जासोबत जोडलेल्या मुद्यांच्या संदर्भात मुद्येनिहाय माहिती कागदपत्राच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता तक्रारदार यांना विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरच्या संस्थेमधील सर्व कागदपत्रे व अभिलेख निरीक्षणाकरीता उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) तक्रारदार यांना कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी तारीख व वेळ जन माहिती अधिकारी यांनी कळवून त्याप्रमाणे सर्व कागदपत्रे निरीक्षण करुन तक्रारदार यांना आवश्यक कागदपत्राच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.
3) तत्कालीन जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या दि.15.5.2009 च्या आदेशाची कोणतीही अंमलबजावणी केली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची कार्यवाही त्यांच्या सक्षम अधिका–यानी करावयाची असून या आदेशाची प्रत विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सक्षम अधिका–याकडे कार्यवाहीसाठी सादर करावी.
4) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1062-1063

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1390 नाग/2010

श्री पी. एम. पद्मावार
बे–1/202 शिवराया सोसायटी समृध्दी संकूल
सिव्हील लाईन अमरावती रोड नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 नागपूर
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 सदर नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.11.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 16.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 3.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 सदर नागपूर यांचेकडे शासकीय निवासस्थानाचे भाडे अन्य शुल्कापोटी आर्थिक दराने आकारणी केली अशा कर्मचा–यांची यादी व सदर आकारणी कमी/रद्द करणारी पत्रे/दस्तऐवजांच्या प्रती गत 10 वर्षाची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने त्यांच्या माहिती मागण्याच्या अर्जानुसार माहिती मिळाली नाही व दिलेले उत्तर असंबध्द आहे म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 17.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली. सुनावणीच्या वेळी अपील अर्जामधील मुद्यांवर चर्चा न करता विषयाला सोडून प्रश्न निर्माण केल्यामुळे अपीलाचा निर्णय होवू शकला नाही. म्हणून अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता सुनावणीच्या वेळी गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे एकून घेता आलेले नाही. तथापी सुनावणीत जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता

सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 सदर नागपूर हे आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 सदर नागपूर हे हजर होते. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 5.5.2010 च्या पत्रान्वये त्यांचेकडील दि. 3.4.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयास दि. 6.4.2010 रोजी प्राप्त झाला असे कळवून त्यात असे नमूद केले की शासना तर्फे तसेच या विभागा मार्फत कोणतेही शासकीय निवासस्थानाचे शुल्क आकारणी कमी करुन देण्यात आलेले नसल्यामुळे त्यासंबंधी कोणतेही कागदपत्र या कार्यालयात उपलब्ध नाहीत. याप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता यांनी अपीलकर्त्याला पोस्टाने माहिती पाठविल्याचे सुनावणीत नमूद केले.

4. प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 नागपूर यांनी सुनावणीत असे नमूद केले की अपीलकर्ता हे शासकीय निवासस्थान रविनगर प्रकार बी निवास क्र. 14/2 येथे सन 1993 ते 2003पर्यंत वास्तव्यास असतांना त्यांची नागपूर शहरा बाहेर बदली झाल्याने त्यांचेकडे एकूण थकबाकी रु. 2,22,655/- येणे आहे. त्यापैकी त्यांनी रु. 39,228/- चा भरणा केलेला असून सुध्दा त्यांचेकडे रु. 1,83,427/- थकीत आहेत. तसेच त्यांनी शासकीय निवासस्थानात असतांना सुध्दा शासनाकडून घरभाडे भत्ता घेतलेला आहे. तसेच अपीलार्थीच्या दि. 17.5.2010 चे अर्जावर दि. 19.6.2010 ला अपील सुनावणीचे वेळी अपील अर्जामधील मुद्यांवर चर्चा न करता विषयाला सोडून प्रश्न निर्माण केले म्हणून त्यांना नेमके काय म्हणावयाचे आहे याबाबत लेखी पत्र देण्यास सुचना दिल्या. परंतू त्यांचेकऊन कोणताही प्रतीसादर मिळाला नाही.

5. अपीलकर्ता यांचा दि. 3.4.2010 चा माहिती अधिकाराचा अर्ज अवलोकन केले असता त्यात असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी शासकीय निवासस्थानाचे भाडे अन्य शुल्कापोटी आर्थिक दराने आकारणी केली अशा कर्मचा-यांची यादी मागितली आहे. व सदर आकारणी कमी अगर रद्द केलेल्या बाबतच्या 10 वर्षाच्या दस्तऐवजाच्या प्रती मागितलेल्या आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दि. 5.5.2010 च्या पत्रान्वये असे कळविलेले आहे की शासाकडून आर्थिक दर कमी करणे किंवा रद्द करणे याबाबत कोणतेही आदेश नसल्यामुळे त्यांच्या प्रती हया पुरविणे शक्य होत नाही. म्हणजे भाडे आकारणीचे आर्थिक दर कमी किंवा रद्द केलेले नाही ही माहिती दिलेली दिसते. मात्र अपीलकर्ता यांनी शासकीय निवासस्थानाचे भाडे अन्य शुल्कापोटी आर्थिक दराने आकारणी केली अशा कर्मचा-यांची यादीची मागणी केलेली दिसून येते. मात्र जन माहिती अधिकारी यांनी आर्थिक दराने शासकीय निवासस्थानाचे भाडे व अन्य शुल्क ज्या कर्मचा-यावर आकारलेले आहे त्याची यादी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येत नाही. म्हणून माहिती अर्जातील संपूर्ण माहिती अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येत नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत ज्या कर्मचा–याकडून शासकीय निवासस्थानाचे भाडे अन्य शुल्कापोटी आर्थिक दराने आकारणी केली त्यांची यादी विनामुल्य रजिस्टर पोस्टाने विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी पाठवावी.

2) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 3.4.2010 च्या माहिती अधिकाराच्या अंतर्गत दि. 5.5.2010 च्या पत्रान्वये ज्या जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 सदर नागपूर यांनी अपूर्ण माहिती दिलेली आहे त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1065-1066

जा.क्र.———————— दि.................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1399 नाग/2010

श्री पी. एम. पद्‌मावार
बे–1/202 शिवराया सोसायटी समृध्दी संकूल
सिव्हील लाईन अमरावती रोड नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर
जुने सचिवालय इमारत नागपूर
2) श्री आय. एच. कुमरे
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक(प्रशासकीय)
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर
जुने सचिवालय इमारत नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.11.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 16.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 3.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 13.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा अंतर्गत अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. अधिनस्त कार्यकारी अभियंते नियमितपणे, निवासस्थान वाटप झालेल्या कर्मचा–यांकडून भाडे वसुलीसाठी, महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधिल नियम 227 नुसार मागणीपत्र पाठवितात यासंबंधी प्राप्त वार्षिक अहवालाच्या प्रती किंवा या विषयी केलेल्या पत्रव्यवहाराच्या/पाठपुरावा पत्रांच्या प्रती.
2. कार्यकारी अभियंता कार्यालयाची आकस्मिक अभियंता यांनी तपासणी घेतली असता, तपासणी अहवालातील, उपरोक्त विषयावरील आक्षेप उता–यांच्या प्रती.
3. भाडे, लायसन्स फी न मिळालेल्या निवासस्थानांची संख्या, उपरोक्त रक्कम व कालावधी (जिल्हा निहाय) रिक्त निवासस्थाने व वितरीत–स्वतंत्रपणे नोंदणीकृत टपालाने.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून सहाय्यक अधिक्षक अभियंता तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 19.6.2010 रोजी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली व दि. 28.6.2010 रोजी निर्णय दिला. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे निर्णयात असे नमूद केले की अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी मुद्या क्र. 1 व 3 बाबत माहिती दिलेली आहे. मात्र मुद्या क्र. 2 बाबत जे वार्षिक निरीक्षण अहवाल वर्ष नमुद न करता पुरविण्यात आलेले आहेत. ते अहवाल वर्ष नमुद करुन माहिती 7 दिवसात विनामुल्य पुरविण्याचे आदेश जन माहिती अधिकारी यांना दिलेले दिसून येतात. तथापी प्रथम अपीलीय अधिका–याचे या निर्णयामुळे त्यांना आवश्यक असलेली माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता हे सुनावणीस गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे एकुन घेता आलेले नाही. तथापी जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर हे सुनावणीस हजर राहून त्यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्ता यांना त्यांच्याकडील दि. 10.5.2010 च्या पत्राने दि. 13.4.2010 च्या माहिती अधिका–याच्या अर्जानुसार मुद्या क्र. 1 व 3 ची माहिती रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आलेली आहे. या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की मुद्या क्र. 1 बाबत त्यांनी असे नमूद केलेले आहे की शासकीय निवासस्थानाबाबत या कार्यालयात कोणतेही अभिलेख ठेवण्यात येत नाही तसेच वसुली मागणी पत्र अहवाल विभागीय स्तरावर ठेवण्यात येते. मुद्या क्र. 2 बाबत असे कळविलेले दिसून येते की सन 2007–08, 2008–09 मधील निरीक्षण आक्षेपाबाबत दोन पृष्ठांची माहिती त्यांना दिलेली आहे. मुद्या क्र. 3 बाबत असे नमूद केलेले आहे की मागितलेली माहिती विभागीय कार्यालयाशी संबंधित असून संबंधित कार्यालयाकडून ती उपलब्ध होवू शकेल आणि एकूण 12 कार्यालयांचे त्यांनी नावे पुरविलेले असून त्यांच्याकडून माहिती प्राप्त करण्याचे कळविलेले आहे.

4. सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक अभियंता यांनी असे नमूद केलेले आहे की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. 10.5.2010 च्या पत्राने पाठविलेली आहे ती पुरविलेली माहिती योग्य होती. मात्र मुद्या क्र. 2 बाबत वार्षिक निरीक्षण अहवालाच्या प्रती दिलेल्या आहेत त्यावर वर्ष नमुद नसल्यामुळे त्या निरीक्षण अहवालावर वर्ष नमुद करुन 7 दिवसात विनामुल्य माहिती अपीलकर्ता यांना पुरविणे बाबत अपीलाचा निर्णय दि. 28.6.2010 च्या पत्राने पंजीबध्द डाकेने कळविण्यात आला.अपीलाच्या या निरीक्षणानुसार जन माहिती अधिकारी यांनी देखील निरीक्षण अहवालाचे वर्ष नमुद करुन अपीलकर्ता यांना कळविलेले आहे.

5. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी मुद्या क्र. 3 बाबत मागितलेली माहिती विभागीय कार्यालयाशी संबंधित असून अपीलकर्ता यांना ती माहिती पाहिजे असल्यास त्या त्या विभागाच्या माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता यांचेकडे अर्ज करुन प्राप्त करुन घ्यावी असे अपीलकर्ता यांना दि. 10.5.2010 च्या पत्राने कविलेले आहे. कारण अधिक्षक अभियंता

यांचे अधिनस्थ एकुण 11 विभागाचे माहिती अधिकारी कार्यरत आहेत. त्यांना माहिती अधिकारी म्हणून नेमलेले आहेत. म्हणून अपीलकर्ता यांना त्या त्या माहिती अधिका–याकडे अर्ज करुन माहिती उपलब्ध करुन घेता येईल. यापृष्ठयर्थ त्यांनी शासनाच्या दि. 6 सप्टेंबर 2008 सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई च्या परीपत्रकातील सुचनांचा पुरावा सादर केला. जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी वरीलप्रमाणे केलेला युक्तीवाद संयुक्तिक वाटतो. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1067-1069

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1385 नाग/2010, अपील क्रमांक 1386 नाग/2010, अपील क्रमांक 1387 नाग/2010 व अपील क्रमांक 1388 नाग/2010**

श्री भगवानदास मैय्यादिन समुन्द्रे
रा. गंगाबाई घाट, म.न.पा. क्वार्टर नं. 7,
नागपूर ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) डॉ. गणविर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा आरोग्य अधिकारी
महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री ए. एन. व–हाडे
जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक
आरोग्य विभाग, महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.11.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये चार द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. या चारही द्वितीय अपीलांमधील विषय एकच असल्यामुळे निर्णयासाठी चारही द्वितीय अपीले एकत्रित करुन एकच निर्णय देण्यात येत आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 16.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 3.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या चारही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक आरोग्य विभाग, महानगर पालिका नागपूर यांचेकडे त्यांचे नातेवाईक श्री राकेश भगवानदास समुन्द्रे, कु. रुपा भगवानदास समुन्द्रे आणि ज्योती शिवराम गवतेले यांनी लाड कमिटी अंतर्गत नोकरी मिळण्याबाबतचे अर्ज दिलेले होते. तथापी त्यांना नोकरी मिळालेली नाही. त्याबाबतची कागदपत्रे त्यांनी स्वतंत्र चार अर्ज माहितीच्या अधिकाराचे सादर करुन माहिती मागितलेली होती. जन माहिती अधिकारी यांनी माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविले. त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा आरोग्य अधिकारी महानगर पालिका नागपूर यांचेकडे अपील क्रमांक 48 ते 51 अशी एकुण चार अपीले दाखल केलेली आहेत. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 18.8.2010 रोजी घेण्यात आली. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे चार द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांच्या चार माहिती अर्जा प्रमाणे मागितलेली माहिती त्यांना मिळाली नाही तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा त्यांना माहिती मिळाली नाही.

4. जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक यांनी सुनावणीत असे सांगितले की त्यांचेकडील दि. 2.8.2010 च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना असे कळविले की श्री राकेश भगवानदास समुन्द्रे, कु. रुपा भगवानदास समुन्द्रे आणि ज्योती शिवराम गवतेले यांच्या लाड कमिटी अंतर्गत नोकरी मिळण्याबाबतच्या अर्जाची माहिती त्यांच्या कार्यालयात नाही.

5. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी तथा आरोग्य अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी दि. 18.8.2010 रोजी घेवून संबंधितांचे म्हणणे एकुन घेवून असा निर्णय दिला की अपीलार्थीने मागितलेल्या माहितीची तपासणी केली असता संबंधित माहितीपैकी काही अर्जाची नोंद त्यावेळी असलेले लिपीक श्री महेश ससनकर यांचे नावाने नोंद वहीत असल्यामुळे त्यांना पत्र देवून कार्यालयात उपस्थित राहण्याचे निर्देश द्यावे व त्यांचेकडून माहितीचा शोध घेवून तशी उपलब्ध झालेली माहिती अपीलार्थीस 7 दिवसाचे आत देण्यात यावी. प्रथम अपीलाच्या या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक यांनी त्यावेळचे लिपीक श्री महेश ससनकर स्वास्थ निरीक्षक झोन क्र. 7 सतरंजीपूरा महानगर पालिका नागपूर यांना दि. 18.8.2010 च्या पत्राने असे कळविले की आपल्या कालावधीत लाड समिती संबंधाने आपण काम करीत असतांना आवक नोंद वहीची तपासणी केली असता त्यामध्ये खालील अर्जाची नोंद आपल्या नावाने केली. 1. ज्योती शिवराम गवतेले 2. श्री राकेश भगवानदास समुन्दे 3. कु. रुपा भगवानदास समुन्द्रे. तथापी कार्यालयात या अर्जाची तपासणी केली असता ते प्राप्त झाले नाही त्या अर्जाची माहिती प्राप्त करण्याकरीता दि. 23.8.2010 रोजी कार्यालयात उपस्थित राहावे जेणेकरुन अपीलार्थीस माहिती देणे हे सोयीचे होईल असे सहा. अधिक्षक यांनी लिपीक श्री महेश ससनकर यांना कळविल्याचे दिसून येते. तसेच नंतर जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक यांनी पुन्हा त्यांचेकडील दि. 23.9.2010 च्या पत्रान्वये श्री महेश ससनकर यांना कारणे दाखवा नोटिस पाठवून असे कळविले की प्रथम अपीलीय अधिकारी यांचे दि. 18.8.2010 च्या आदेशान्वये आपल्या माहितीचा शोध घेवून माहिती उपलब्ध करुन देण्यास्तव लेखी पत्र देवून सुध्दा हजर झाले नाहीत त्याबाबत आपले स्पष्टिकरण 24 तासाचे आत सादर करावे. या नोटिसीला अनुसरुन श्री महेश ससनकर यांनी त्यांचेकडील दि. 23.9.2010 नुसार जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक आरोग्य विभाग, महानगर पालिका नागपूर यांना असे कळविले की ते सन 2008पर्यंत लाड कमिटीचा टेबल सांभाळीत होते. दरम्यानच्या कालावधीत त्यांना ब्रेन अटॅक आणि पॅरालीसीस झाला होता. त्यामुळे ते हॉस्पीटलमध्ये ॲडमिट होते. ते हॉस्पीटलमध्ये ॲडमिट असतांना त्यांचा टेबल प्रशासनाने श्री संतोष बैरीसाल यांना दिला. त्यांचे काळात सर्व दस्तऐवज ऑफीसमध्येच होते व सर्व केसेस व्यवस्थित आहेत. त्यामुळे श्री भगवान समुन्द्रे यांचे दस्तऐवज ऑफीसमध्येच असावेत. त्यांचेकडून कुठल्याही प्रकारचे दस्तऐवज गहाळ झालेले नाहीत असा श्री ससनकर यांनी खुलासा केलेला आहे.

6. यावरुन असे दिसून येते की श्री भगवान समुन्द्रे यांनी माहितीच्या अधिकारा खाली जी माहिती मागितलेली आहे त्याचा जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे स्तरावरुन कसून शोध घेणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी लाड कमिटीच्या टेबलचे काम पाहणारे तत्कालीन लिपीक श्री महेश ससनकर आणि श्री संतोष बैरीसाल यांना प्रत्यक्ष कार्यालयात एकत्रितपणे बोलावून श्री भगवान समुन्द्रे यांनी मागितलेल्या माहितीचा कसून शोध घेवून त्यांना ती माहिती हा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून 10 दिवसाचे आंत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) प्रथम अपीलीय अधिकारी तथा आरोग्य अधिकारी यांनी वरील माहिती उपलब्ध न झाल्यास याबाबतची संबंधित लिपीकावरती जबाबदारी निश्चित करावी व त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1068-1070

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1382 नाग/2010**

श्री नरेश मनोहरराव चारमोरे
प्लॉट नं. 38 अत्रे लेआऊट प्रताप नगर
नागपूर ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(नि.)
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.11.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 16.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीत हजर राहण्याचे आदेशित केलेले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 10.11.2009 रोजी घेण्यात आली. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांचेकडे एकुण 1 ते 14 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. तथापी अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि. 25.8.2010 रोजी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांचेकडे दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दि. 8.9.2010 रोजी घेण्यात येवून प्रथम अपीलाचा निर्णय दि. 16.9.2010 रोजी देण्यात आला. तथापी प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर अपीलकर्ता यांना पाहिजे असलेली माहिती उपलब्ध झाली नाही तसेच काही माहिती अपूर्ण स्वरुपात मिळाली म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. सुनावणीत अपीलकर्ता यांचे वतीने ॲड. तुषार मंडलेकर यांनी युक्तीवाद केला. त्यांनी युक्तीवादात असे नमुद केले की त्यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे दि. 17.7.2010 रोजी माहितीच्या अधिकाराखाली

अर्जाप्रमाणे एकुण 1 ते 14 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. मात्र त्यांना ती माहिती मुदतीत प्राप्त झाली नाही किंवा त्याबाबत त्यांना काहीही जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले नाही. म्हणून ते दि. 18.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित झाले. त्यावेळी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 7.8.2010 चे पत्र दिले. त्या पत्रामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कार्यालयात 3 ते 5 यावेळेत उपस्थित राहून धारीकेचे निरीक्षण करण्यास कळविले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हे जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दि. 20.8.2010 रोजी उपस्थित राहिले. मात्र त्यांना निरीक्षणासाठी कोणतीही धारीका उपलब्ध झाली नाही त्यामुळे त्यांना कोणतीही माहिती प्राप्त करुन घेता आली नाही असा युक्तीवाद ॲड. तुषार मंडलेकर यांनी केला.

4. सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता नागपूर सुधार प्रन्यास नागपूर हे उपस्स्थित होते. त्यांनी प्रस्तुत प्रकरणी असे सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 7.8.2010 रोजी त्यांच्या कार्यालयात येवून धारीका निरीक्षणाचे जे पत्र दिलेले आहे ते तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी पोस्टाने पाठविलेले दिसून येते. परंतू पत्रातील सुचनाप्रमाणे अपीलकर्ता हे त्यांच्या कार्यालयात धारीका निरीक्षणासाठी आले असतांना त्यांना ती धारीका निरीक्षणास उपलब्ध झाली नाही असे कागदपत्रांवरुन दिसून येते.

5. अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दि. 16.9.2010 रोजी पारीत केलेला असून त्यामध्ये अपीलार्थी यांना हा आदेश प्राप्त झाल्यापासून 10 दिवसाचे आत इमारत अभियंता पश्चिम यांचे कार्यालयात उपस्थित राहून धारीकेचे निरीक्षण करावे. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांनी अपीलार्थीस मुळ अर्जात अभिप्रत असलेले दस्तऐवज विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना त्यांचेकडील दि. 9.9.2010 च्या माहितीच्या अधिकारा अंतर्गत मागितलेल्या माहितीबाबत एकुण 1 ते 8 मुद्यांवर माहिती दिलेली दिसून येते. आणि सदरची माहिती अपीलकर्ता यांना मिळाल्याची आयोगाची खात्री झालेली आहे.

6. एकंदरीत अपीलकर्ता यांचे प्रस्तुत प्रकरणी असे म्हणणे आहे की त्यांना माहितीच्या अधिकारा खालील दि. 17.7.2010 चा अर्ज हा प्रश्नार्थक स्वरुपात आहे. मात्र त्या अर्जातील ज्या मुद्याची माहिती नागपूर सुधार प्रन्यासकडे उपलब्ध आहे ती त्यांना देणे माहितीच्या अधिकारा खाली बंधनकारक आहे. आणि ती माहिती त्यांना जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच नागपूर यांच्या समोर असलेल्या अपीलासाठी पाहिजे आहे असाही युक्तीवाद त्यांनी केला. ही वस्तुस्थिती लक्षात घेता अपीलकर्ता यांचा दि. 17.7.2010 चा माहितीच्या अधिकारा खालील अर्जात एकुण 1 ते 14 मुद्यांच्या बाबत जी कागदपत्रे उपलब्ध आहेत ती कागदपत्रे हा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून 10 दिवसाचे आत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने पाठविणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा इमारत अभियंता पश्चिम नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांनी हा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून 10 दिवसाचे आत अपीलकर्ता यांचेकडील दि. 17.7. 2010 च्या अर्जातील मुद्या क्र. 2,4,5,6,10,11,12,14 च्या संबंधात उपलब्ध असलेली कागदपत्रे विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तीशः त्यांना पाठविण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1072-1074

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 291/2010

श्री प्रभाकर जयरामजी देऊळकर
वेदधारीनी नगर, आनंद नगर जवळ
उमरसरा यवतमाळ ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद यवतमाळ
ता. जि. यवतमाळ ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 30.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 5.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.10.2010 रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर आहेत. गैरतक्रारदार जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी कुटुंब कल्याण पथक जिल्हा परिषद यवतमाळ यांचे वतीने श्री डेडे प्रशासकिय अधिकारी सुनावणीत हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी दिनांक 5.8.2010 चे तक्रार अर्जाप्रमाणे अशी तक्रार केलेली आहे की आयोगाकडील अपील क्र. 1218/2010 मध्ये दि. 28.1.2010 ला पारीत झालेल्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना माहिती मिळाली नाही. तथापी तक्रारदार हे आजच्या सुनावणीत हजर नसल्यामुळे त्यांचे म्हणणे एकुन घेता आले नाही.

3. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी कुटुंब कल्याण पथक जिल्हा परिषद यवतमाळ यांनी सुनावणीच्या दिवशी लेखी निवेदन देवून असे नमूद केले आहे की तक्रारदार यांना एकुण 1 ते 4 मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. आणि सदरची माहिती तक्रारदार यांना उपलब्ध करुन दिल्याबाबतच्या कार्यालयीन प्रती सुनावणीत आयोगासमोर दाखवून सादर केल्या आहेत. मात्र मुद्या क्र. 5 हा श्री के. पी. लहाने विस्तार अधिकारी याच्या तक्रारीच्या संदर्भात आहे. सदरच्या तक्रारीचा शोध घेतला असता ती कार्यालयात उपलब्ध नसल्याने ती तक्रारदारास उपलब्ध करुन देता आली नाही. मात्र इतर संपूर्ण माहिती तक्रारदार यांना उपलब्ध करुन दिलेली आहे.

4. तक्रारदार यांना 1 ते 4 मुद्यांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेली असून मुद्या क्र. 5 श्री के. पी. लहाने यांच्या विषयी केलेली तक्रार त्यांच्या कार्यालयात शोध घेवूनही उपलब्ध होवू शकली नाही त्यामुळे ती देण्याचा प्रश्न उद्भवत नाही म्हणून तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

# आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1076-1077

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 287/2010**

श्री गजेंद्र रामाजी मानकर
द्वारा जिल्हा आरोग्य विभाग
जिल्हा परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी
प्राथमिक आरोग्य केंद्र केशोरी
जि. गोंदिया ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 30.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 5.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.10.2010 रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र केशोरी हे सुनावणीस गैरहजर आहेत.

2. तक्रारदार यांनी दिनांक 5.8.2010 च्या तक्रार अर्जाप्रमाणे अशी तक्रार केलेली आहे की आयोगाकडील अपील क्र. 874/2010 मधील दि. 16.7.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही.

3. गैरतक्रारदार जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र केशोरी हे सुनावणीस गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे एकुन घेता आलेले नाही. किंवा त्यांनी कोणत्याही प्रकारचा लेखी खुलासा देखील केलेला नाही. यावरुन असे दिसून येते की जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र केशोरी यांनी प्रस्तूत प्रकरणाची कोणतीही गांभीर्याने दखल घेतलेली नाही. म्हणून तक्रारदार यांचा तक्रार अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

# आ दे श

1) तक्रारदार यांचा तक्रार अर्ज मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र केशोरी यांनी तक्रारदार यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात प्राथमिक आरोग्य केंद्र केशोरी यांचे कार्यालयामध्ये त्यांच्या नस्तीचा शोध घेवून हा आदेश मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध झाल्यास पुरविण्यात यावी.

2) जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र केशोरी यांनी आयोगाकडील आजच्या सुनावणीची कोणतीही दखल घेतलेली नाही किंवा त्याबाबतचा कोणताही लेखी अहवाल आयोगाकडे सादर केला नाही म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 10000/- ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत आयोगापुढे करावा अन्यथा शास्ती कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

3) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1079-1080

जा.क्र.---------- दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 263/2010**

श्री अनवरखान अ. रहमान खान
छोटी मस्जीद ट्रस्ट व वक्फ कमेटी
(बी–12) व एमएसबीडब्ल्यु 12/08
कस्तुरबा रोड, एस.बी.आय जवळ, चंद्रपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री वरुण कुमार सहारे
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार चंद्रपूर
ता. जि. नागपूर चंद्रपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 30.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 6.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.10.2010 रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार चंद्रपूर हे सुनावणीस हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी दिनांक 6.8.2010 च्या तक्रार अर्जाप्रमाणे अशी तक्रार केलेली आहे की अपील क्र. 432/2009 मधील दि. 26.8.2009 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे तक्रारदाराने मागितलेली माहिती व कागदपत्रे 10 दिवसाचे आत मिळाली नाही. म्हणून त्यांनी तक्रार दाखल केलेली आहे.

3. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार चंद्रपूर श्री वरुण कुमार सहारे यांनी सुनावणीत असे सांगितले की तक्रारदार यांनी मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भातील प्रकरणे तहसिल कार्यालयाचे अभिलेखागारात संपूर्ण रेकॉर्डची तपासणी केल्यानंतर आढळुन आली नाही. तक्रारदार यांनी मागणी केलेल्या माहितीशी संबंधित प्रकरणे 26 वर्षापूर्वीची असून ती कार्यालयात उपलब्ध नाही. करीता माहिती देता येणार नाही. याबाबत तक्रारदारास त्यांचेकडील दि. 13.10.2010 अन्वये कळविण्यात आलेले आहे आणि दि. 13.10.2010 चे माहिती उपलब्ध नसल्याचे पत्र तक्रारदारास मिळाल्याची पोच त्यांनी सुनावणीत दाखल केलेली आहे.

4. प्रस्तूत प्रकरणी आयोगाचे अपील क्र. 432/2009 मध्ये दि. 26.8.2009 रोजी आदेश पारीत करुन त्यात असे नमूद केलेले आहे की जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण तहसिल कार्यालयातील अभिलेखाचा शोध घेवून किंवा जिल्हाधिकारी कार्यालयात शोध घेवून जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल असे आयोगाने कळविलेले होते. तथापी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार चंद्रपूर यांनी त्यांचेकडील दि. 28.10.2010च्या पत्रा प्रमाणे आयोगास असे लेखी दिलेले आहे की तक्रारदाराच्या संबंधातील माहितीच्या बाबत तहसिल कार्यालयाचे अभिलेखागारात संपूर्ण रेकॉर्डची तपासणी केली मात्र मागितलेली माहिती मिळालेली नाही. म्हणजे जिल्हाधिकारी कार्यालयात जावून या माहितीचा शोध जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला नाही असे दिसून येते. म्हणजे जन माहिती अधिकारी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात या माहितीच्या बाबत पुन्हा शोध घेवून माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत असून त्यांनी दि. 6.8.2010 रोजी मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जिल्हाधिकारी कार्यालयात कसून शोध घेवून उपलब्ध झाल्यास व्यक्तीशः विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता तक्रारदार यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसानंतर कोणत्याही कामकाजाच्या दिवशी जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध झाल्यास उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) जन माहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे कार्यवाही केल्यानंतर तक्रारदार यांनी मागितलेली माहिती उपलब्ध न झाल्यास या बाबीस जबाबदार असणा—या अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुध्द त्यांना लागू असलेल्या सेवानियमान्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे. त्यासाठी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सक्षम अधिकारी यांचेकडे या निर्णयाची प्रत सादर करावी.
3) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1082-1083

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1344 नाग/2010

श्री विजय पुंडलिकराव आरेकर
मु. पो. ता. अर्जुनी/मोरगांव
जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
बाघ इटीया डोह पाटबंधारे विभाग, गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) जन माहिती अधिकारी
बाघ इटीया डोह पाटबंधारे विभाग, गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.11.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.9.2010 रोजीच्या अर्जाने राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 13.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 10.11.2010 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता बाघ इटीया डोह पाटबंधारे विभाग, गोंदिया हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता बाघ इटीया डोह पाटबंधारे विभाग, गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्री सुधाकर गणपतराव आरेकर मु. पो. ता. अर्जुनी/मोरगांव जि. गोंदिया यांच्या सर्व्हिस बुकानुसार जन्म तारखेचा दाखल (टी.सी.) ची प्रत मिळण्याबाबत अर्ज केलेला आहे. तथापी त्यांना माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दि. 21.4.2010 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे त्यांना मागितलेली माहिती प्राप्त झाली नाही तसेच प्रथम अपीलाचा निर्णय देखील प्राप्त झाला नाही त्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती आजतागायत मिळालेली नाही.

4. सुनावणीत जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता बाघ इटीया डोह पाटबंधारे विभाग, गोंदिया यांनी असे सांगितले की श्री सुधाकर गणपतराव आरेकर हे त्यांच्या कार्यालयात कार्यरत होते. मात्र ते आता सेनानिवृत्त झालेले आहेत. त्यांची जन्म तारीख व सर्व्हिस बुकाच्या पहिल्या पानाची प्रत अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज देवून मागितलेली आहे. तथापी सदरची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्यामुळे त्रयस्थ पक्ष म्हणून श्री सुधाकर गणपतराव आरेकर यांनी त्यांचेकडील दि. 3.4.2009 च्या पत्राप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता बाघ इटीया डोह पाटबंधारे विभाग, गोंदिया यांना कळविले की श्री विजय पुंडलिकराव आरेकर यांनी त्यांच्या कार्यालयात माहितीच्या अधिकाराखाली अर्ज दिला असून त्यांच्या अर्जा प्रमाणे त्यांच्या सेवापुस्तकातील कोणतेही कागद किंवा पेंशनचे पी.पी.ओ. संबंधी दस्तऐवज श्री विजय पुंडलिकराव आरेकर यांना देवू नये. कारण श्री विजय पुंडलिकराव आरेकर हे त्यांना मानसिक त्रास/हानी/घातपात साधण्याच्या प्रयत्नात असून त्यांना धोका आहे असे त्रयस्थ पक्ष म्हणून श्री सुधाकर गणपतराव आरेकर यांनी जन माहिती अधिकारी यांना कळविले. जन माहिती अधिकारी यांनी असेही सांगितले की श्री सुधाकर गणपतराव आरेकर हे त्रयस्थ पक्ष असल्यामुळे त्यांनी त्यांच्या संबंधातील माहिती अपीलकर्त्यास देण्यास आक्षेप घेतला असल्यामुळे त्रयस्थ पक्षाची व वैयक्तिक स्वरुपाची ही माहिती असल्यामुळे ती माहिती अपीलकर्ता यांना दिलेली नाही व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 20.11.2009 रोजीच्या पत्राप्रमाणे माहिती देणे शक्य नाही असे कळविलेले आहे.

5. अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाचा एक अर्ज कार्यकारी अभियंता बाघ इटीया डोह पाटबंधारे विभाग, गोंदिया यांचेकडे दि. 20.2.2010 रोजी दिलेला दिसतो व दुसरा प्रथम अपीलाचा अर्ज अधिक्षक अभियंता प्रादेशिक लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण नागपूर यांचेकडे दाखल केलेला दिसतो. परंतू प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही.

6. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की अपीलकर्ता यांना श्री सुधाकर गणपतराव आरेकर मु. पो. ता. अर्जुनी/मोरगांव जि. गोंदिया यांच्या सर्व्हिस बुकानुसार जन्म तारखेचा दाखल (टी.सी.) ची प्रत मिळावी अशी त्यांची मागणी आहे. श्री सुधाकर गणपतराव आरेकर हे जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातील सेवानिवृत्त कर्मचारी आहेत. सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचे सेवापुस्तक जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध आहे. म्हणून शासकीय कार्यालयात उपलब्ध असलेल्या सर्व्हिस बुकातील उपलब्ध माहितीची झेरॉक्स प्रत अपीलकर्त्याला देणे योग्य व न्यायोचित होईल. कारण श्री सुधाकर गणपतराव आरेकर हे त्रयस्थ पक्ष असले तरी ते सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी आहेत. त्यांच्याशी संबंधित असलेली सर्व्हिस बुकातील आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्यास कोणत्याही गोपनिय माहितीचा भंग होत नाही. म्हणून अपीलकर्त्यास त्यांचेकडील दि. 6.11.2009 च्या माहिती अधिकाराखालील अर्जात मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 6.11.2010 च्या अर्जा माहितीच्या अधिकाराखालील अर्जात मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता बाघ इटीया डोह पाटबंधारे विभाग, गोंदिया जिल्हा गोंदिया यांनी व्यक्तशः उपलब्ध करुन द्यावी. अपीलकर्ता यांनी 10 दिवसानंतर जन माहिती अधिकारी यांचेकडे प्रत्यक्ष संपर्क साधावा व माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1083-1085

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 282/2010**

श्री विनोदकुमार गंगाराम बियाला
द्वारा प्रेमलाल शाहू, गणेश सॉ मिल समोर,
हरिहर नगर पुलगांव
जि. वर्धा 442302 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी
न्यु लोकहित शिक्षण संस्था
द्वारा धैर्यशीलराव वाघ कनिष्ठ महाविद्यालय रोहणा
ता. आर्वी जि. वर्धा ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 30.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 5.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.10.2010 रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. सदर सुनावणीत तक्रारदार गैरहजर आहेत. गैरतक्रारदार जन माहिती अधिकारी न्यु लोकहित शिक्षण संस्था द्वारा धैर्यशीलराव वाघ कनिष्ठ महाविद्यालय रोहणा ता. आर्वी जि. वर्धा हे उपस्थित होते.

2. तक्रारदार यांनी दिनांक 5.7.2010 रोजीच्या तक्रार अर्जाप्रमाणे अशी तक्रार केलेली आहे की आयोगाकडील दि.19.4.2009 रोजी दिलेल्या अपील क्र. 250 नाग/2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून 10 दिवसाचे आंत माहिती मिळाली नाही.

3. तक्रारदार सुनावणीस गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे एकून घेता आलेले नाही. तथापी सुनावणीस जन माहिती अधिकारी न्यु लोकहित शिक्षण संस्था द्वारा धैर्यशीलराव वाघ कनिष्ठ महाविद्यालय रोहणा ता. आर्वी जि. वर्धा श्री गौरव वाघ हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की, तक्रारदार यांनी मागितलेली माहिती त्यांना दि. 31.7.2010 च्या पत्राने रजिस्टर पोस्ट करुन पाठविली होती. परंतू ती त्यांनी स्वीकारलेली नाही. रजिस्टर परत आल्याबाबतचा पुरावा त्यांनी आयोगापुढे सादर केलेला आहे. यावरुन असे दिसून येते की तक्रारदार यांना पाहिजे असलेली माहिती रजिस्टर

पोस्टाने जन माहिती अधिकारी यांनी दि. 31.7.2010 च्या पत्राने पाठविलेली दिसून येते. मात्र पोस्टाकडून रजिस्टर पत्र ''नॉट क्लेम'' म्हणून परत आलेले आहे. म्हणून तक्रारदार यांना पुन्हा एकदा रजिस्टर पोस्टाने माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनामुल्य पाठवावी. म्हणून तक्रारदार याची तक्रार खारीज करण्यात येते.

**आ दे श**

1) तक्रारदार याची तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1084-1085

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 290/2010

श्री संजय गोलावार
रामनगर वर्धा
ता. जि. वर्धा ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री वि. न. शेळके
जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
लघु पाटबंधारे विभाग,
वैनगंगा नगर, अजनी, नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 30.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 18.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.10.2010 रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर आहेत. गैरतक्रारदार जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
लघु पाटबंधारे विभाग, वैनगंगा नगर, अजनी, नागपूर हे सुनावणीस उपस्थित असून त्यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

2. तक्रारदार यांनी तक्रार अर्जाप्रमाणे अशी तक्रार केलेली आहे की आयोगाकडील दि.18.8.2010 रोजी दिलेल्या अपील क्र. 849/2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांच्या दि. 21.5.2009 च्या अर्जातील मुद्या क्र. 6 ऐवजी 5 ची माहिती मिळवून देण्याबाबत आदेश व्हावे अशी विनंती केलेली आहे.

3. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग, नागपूर यांनी सुनावणीत असे सांगितले की आयोगाच्या दि. 5.7.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे तक्रारदार यांना आवश्यक ती माहिती दि. 17.8.2010 च्या पत्राने दिलेली आहे. मात्र तक्रारदार यांच्या दि. 21.5.2010 चे माहिती अधिकारच्या अर्जातील मुद्या क्र. 5 च्या अनुषंगाने कळविण्यात येते की गोळ लघु कालव्याचा संरेखा प्रस्ताव त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. परंतू सदर प्रस्तावाचे मंजूरीचे आदेशाची प्रत उपलब्ध नाही. सदर प्रकरणी कामाची मागणी केलेले तक्रारदार यांचे पत्रानुसार बांधकाम विभागाने वरिष्ठ कार्यालयाला सादर केलेले पत्र व वरिष्ठ कार्यालयाने बांधकाम विभागाला सदर

बांधकाम करण्याविषयी दिलेल्या निर्देशाचे पत्र उपलब्ध आहे. आणि उपलब्ध दस्तऐवजा मधून माहिती तक्रारदारास पुरविण्यात आली. तसेच तक्रारदारास नकाशा पुरविण्यात आला. तदनंतर मुळ संरेखेप्रमणे संपादीत जागेमध्ये बांधकाम करण्यासाठी तत्कालीन कार्यकारी अभियंता निम्न वर्धा कालवे विभाग वर्धा यांना वरिष्ठ कार्यालयाने परवानगी दिली त्या पत्राची प्रत तक्रारदार यांना दि. 17.8.2010 अन्वये पुरविण्यात आलेली आहे.

4. तक्रारदार सुनावणीस उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे एकून घेता आलेले नाही. एकंदरीत जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग, नागपूर यांनी सुनावणीत या कार्यालयाकडे सादर केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की त्यांनी तक्रारदारास दि. 17.8.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती पुरविलेली आहे. त्यामुळे तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार याची तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1087-1088

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 191/2010**

श्री सुरजप्रसाद वल्द कालीचरण दुबे
एल. आय. जी. ए–2 ऋशिनगर
उज्जैन (मध्यप्रदेश) ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय नरखेड ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 28.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 7.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 11.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 28.10.2010 रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार हजर आहेत. तसेच गैरतक्रारदार जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री पी.आर.साधनकर तहसिल कार्यालय नरखेड हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी दिनांक 7.6.2010 रोजीच्या तक्रार अर्जाप्रमाणे अशी तक्रार केलेली आहे की त्यांच्याकडील दि. 8.7.2009 च्या माहितीच्या अधिकाराखालील अर्जाप्रमाणे तहसिलदार काटोल यांचेकडून संपूर्ण माहिती मिळाली नाही.

3. तक्रारदार यांनी सुनावणीत असे सांगितले की मौजा रामपूरी या गावातील त्यांच्या जमीनी बाबतची सन 1946 ते सन 1954 या कालावधीतील माहिती पाहिजे होती. मौजा रामपूरी हे गाव जुलै 1984पर्यंत काटोल तहसिल मध्ये होते त्यानंतर सदरचे गाव नरखेड तहसिलमध्ये समाविष्ट झालेले आहे. म्हणून त्यांनी तहसिलदार काटोल व तहसिलदार नरखेड यांचेशी वेळोवेळी संपर्क साधून माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला तथापी त्यांना ती माहिती मिळाली नाही.

4. सुनावणीत श्री पी.आर.साधनकर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी त्यांचेकडील कागदपत्रे सादर केली व असे नमूद केले की तक्रारदार यांनी मौजा रामपूरी हे प.ह.नं. 37 सर्व्हे नं.6 आराजी 25.37 एकर या जमीनीबाबत सन 1951:52 पासून शेतीच्या रेकॉर्ड बाबत माहिती मागितली आहे. तक्रारदार यांना त्यांच्या कार्यालयाशी संबंधी त्यांचे शेतीचा 1. गाव नमुना 7/12, 8 अ नकाशा 2. अधिकार अभिलेख पंजीची प्रत व 3. दि. 23.2.1956 ला केलेल्या दानपत्राची प्रत ही माहिती पुरविलेली आहे. तथापी तक्रारदार यांनी मौजा रामपूरी येथील शेतीचा सन 1951 पासून जुन्या रेकॉर्डची मागणी केलेली आहे. नरखेड तहसिल सन 1981 मध्ये स्थापीत करण्यात आलेली आहे. यापूर्वी नरखेड तहसिलची सर्व गावे काटोल तहसिलमध्ये समाविष्ट होती. त्यामुळे संबंधित शेतीचा रेकॉर्ड उपलब्ध करुन देण्याबाबत तहसिलदार काटोल यांना कळविण्यात आले. मात्र तहसिलदार काटोल यांनी नरखेड तहसिल कार्यालयाचे संबंधित सर्व रेकॉर्ड नरखेड तहसिलमध्ये पाठविल्याचे कळविले. तथापी नरखेड तहसिल कार्यालयात सदरचे रेकॉर्ड मिळण्याबाबत नोंद नाही. त्यामुळे तक्रारदार यांना जुना रेकॉर्ड नरखेड तहसिल कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे देण्यात आलेला नाही. मात्र जो नरखेड तहसिल कार्यालयात उपलब्ध झालेला आहे तो त्यांना पुरविण्यात आलेला आहे.

5. एकंदरीत तक्रारदार व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की तक्रारदार यांना नरखेड तहसिल कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती त्यांना देण्यात आलेली आहे. परंतू काटोल तहसिल कार्यालयाकडून जे रेकॉर्ड नरखेड तहसिल कार्यालयात पाठविण्यात आलेले आहे त्यामध्ये तक्रारदाराना पाहिजे असलेली माहिती उपलब्ध नाही. त्याचे कारण असे आहे की तक्रारदाराने सन 1946 ते सन 1954 या कालावधीतील माहिती मागितलेली आहे. त्यामुळे फार जुनी माहिती असल्यामुळे तीचा शोध घेता आला नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तथापी जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत असेही सांगितले की एकवेळ ते स्वतः काटोल तहसिल कार्यालयात जावून काटोल तहसिल कार्यालयातील अभिलेख कक्षात तक्रारदाराना पाहिजे असलेल्या माहितीचा शोध घेण्याची कार्यवाही करुन जुने रेकॉर्ड उपलब्ध झाल्यास त्यांना पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत नरखेड तहसिल कार्यालय व काटोल तहसिल कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहून तक्रारदारास पाहिजे असलेल्या माहितीचा कसून शोध घ्यावा व माहिती उपलब्ध झाल्यास तक्रारदारास विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावी.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1090-1091

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1361 नाग/2010**

श्री गजानन कन्हैया चावरे
वाल्मीक वार्ड मु. पो. आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ढाके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा
2) जन माहिती अधिकारी तथा
नगर परिषद कार्यालय आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.22.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 24.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 14.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 12.11.2010 रोजी घेण्यात आली. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपीक नगर परिषद आर्वी यांचेकडे श्री कैलास गोकूळ चावरे यांची नियुक्ती आदेश प्रत व ज्या सभेमध्ये ठराव मंजूर करण्यात आला त्या ठरावाची सत्य प्रत तसेच श्री कैलास गोकूळ चावरे यांची नियुक्ती कोणाच्या रिक्त जागेवर करण्यात आली त्याची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी जन माहिती अधिकारी यांनी दोन कागदाच्या सत्यप्रती दिल्या त्यामध्ये श्री कैलास गोकूळ चावरे यांच्या नियुक्तीची प्रत आणि त्यांच्या सर्व्हिस बुकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत हया दोनच प्रती दिल्या मात्र ठरावाची प्रत दिली नाही. म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 27.7.2010 रोजी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद आर्वी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 4.8.2010 रोजी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली व दि. 4.8.2010 रोजी निर्णय

दिला. मात्र त्या निर्णयानंतर देखील अपीलकर्ता यांना ठरावाची प्रत उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीत अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांच्या अर्जाप्रमाणे त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी त्यांना श्री कैलास गोकूळ चावरे यांच्या नियुक्तीची प्रत आणि त्यांच्या सर्व्हिस बुकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत ही दोन कागदपत्रे जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपीक नगर परिषद आर्वी यांचेकडून दि. 28.6.2010 रोजी प्राप्त झाला. मात्र श्री कैलास गोकूळ चावरे यांची नियुक्ती ज्या ठरावान्वये करण्यात आली त्या ठरावाची प्रत मात्र त्यांना उपलब्ध झाली नाही.

4. जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी हे आजच्या सुनावणीत उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमूद केले आहे की अपीलकर्ता यांना श्री कैलास गोकूळ चावरे यांच्या नियुक्ती आदेशाची प्रत आणि सर्व्हिस बुकाची मुळ पानाची छायांकित प्रत अर्जदारास दि. 28.6.2010 ला देण्यात आली. त्याची पोच त्यांनी सुनावणीत आयोगापुढे हजर केली. मात्र अर्जदाराने ठरावाची प्रत मागणी केली होती त्याबाबत त्यांनी असा खुलासा केला की सदरचे प्रोसिंडींग बुक हे सन 1993 चे असल्यामुळे ते कार्यालयात उपलब्ध नव्हते. सदरचे प्रोसिंडींग बुक इतर विभागात कार्यालयीन कामकाजाकरीता किंवा लेखा परीक्षणाकरीता इतरत्र होते. म्हणून अपीलकर्त्यांना ठरावाची प्रत मुदतीत देता आली नाही. सदर प्रोसिंडींग बुकचा शोध घेतला असता सदरचे प्रोसिंडींग बुक हे दि. 12.10.2010 रोजी कर विभागात मिळाले. व त्यानंतरही त्याच दिवशी दि. 12.10.2010 रोजी ठरावाची प्रत काढून ती नगर परिषदेच्या शिपाया मार्फत हस्तदेय डाक बुकातून अपीलकर्ता यांना पाठविले. मात्र अपीलकर्ता यांनी ती प्रत घेण्यास नकार दिला असा शेरा नगर परिषदेचे शिपायी श्री देवासे यांनी नमूद करुन नगर परिषदेस ते पत्र जन माहिती अधिकारी यांचेकडे परत केले.

5. त्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या ठरावाची प्रत रजिस्टर पोस्टाने दि. 12.10.2010 रोजी व 11.10.2010 रोजी पाठविले. मात्र अपीलकर्ता यांनी दोन्ही रजिस्टर पत्रे घेतली नााही म्हणून दोन्ही रजिस्टर पत्रे जन माहिती अधिकारी यांचेकडे परत आली. ही दोन्ही रजिस्टर पत्रे सुनावणीत सादर केली. त्यावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी रजिस्टर पोस्टाने पाठविलेली दोन्ही रजिस्टर पत्रे घेतलेली नाहीत. याबाबत अपीलकर्ता यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की ही दोन्ही रजिस्टर पत्रे मला मिळाली नाहीत. त्यामुळे त्याबाबतही त्यांना ठरावाची प्रत प्राप्त झाली नाही. अपीलकर्ता यांना ठरावाची प्रत सुनावणीत देखील उपलब्ध करुन देण्यास जन माहिती अधिकारी यांनी संमती दिली. त्यानुसार आयोगासमक्ष आजच्या सुनावणीत ठरावाची प्रत अपीलकर्ता यांना देण्यात आली.

6. एकंदरीत अपीलकर्ता यांना पाहिजे असलेली माहिती त्यांना उपलब्ध झाली आहे मात्र ठरावाची प्रत त्यांना मुदतीत मिळालेली नाही हे स्पष्ट होते. ठरावाची प्रत मुदतीत

अपीलकर्ता यांना देण्यासाठी प्रोसिंडींग बुकचा शोध त्याच वेळी घेतला असता तर ठरावाची प्रत मुदतीत देणे शक्य होते. मात्र जन माहिती अधिकारी यांनी प्रोसिंडींग बुकचा शोध त्वरीत न घेतल्यामुळे ठरावाची प्रत अपीलकर्त्यास मिळण्यास विलंब झालेला दिसून येतो. म्हणून जन माहिती अधिकारी हे विलंबास जबाबदार दिसून येतात. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी मागणी केलेल्या ठरावाची प्रत विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही त्यांच्या सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1089-1091

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1373 नाग/2010

श्री किशोर विनायकराव सोनटक्के
शिवकृपा निवास, गायत्री नगर,
आठवडी बाजार, कारगील चौक, गडचिरोली
ता. जि. गडचिरोली – 442605 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सी. एम. धारणकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक
गडचिरोली वन विभाग गडचिरोली
ता. जि. गडचिरोली
2) श्री पी. एम. तेलमासरे
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (तेंदू)
गडचिरोली वन विभाग गडचिरोली
ता. जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.11.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून नोटीस काढून दि. 16.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (तेंदू) गडचिरोली वन विभाग गडचिरोली यांचेकडे एकुण सहा मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत सर्व मुद्यांची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक गडचिरोली वन विभाग गडचिरोली यांचेकडे दाखल केले. मात्र त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांच्या माहिती अधिकारा खालील दि. 9.7.2010 च्या मुळ अर्जात मागणी केल्याप्रमाणे एकुण सहा मुद्यांपैकी तीन मुद्यांची माहिती त्यांना मिळाली व तीन मुद्यांची माहिती त्यांना मिळालेली नाही.

अपीलकर्ता यांना ज्या तीन मुद्यांची माहिती मिळालेली नाही ते तीन मुद्दे त्यांनी खालील प्रमाणे नमूद केले. 1. श्री सी. एम. धारणकर उपवनसंरक्षक हे वैद्यकीय रजेवर गेले तो वैद्यकीय रजेचा अर्ज अपीलकर्ता यांना दिलेला नाही. 2. श्री सी. एम. धारणकर उपवनसंरक्षक गडचिरोली यांनी घेतलेल्या वेतन पत्रकाच्या प्रमाणित झेरॉक्स प्रती फक्त एप्रिल 2010, मे 2010 व जुन 2010 या 3 महिन्यांच्या दिलेल्या आहेत. मात्र ते रुजू झाल्यापासून ते आतापर्यंतच्या त्यांना दिलेल्या नाहीत. 3. श्री सी. एम. धारणकर उपवनसंरक्षक गडचिरोली हे गडचिरोली वन विभागात रुजू झाल्यापासून त्यांनी शासनास सादर केलेली दैनंदिनी पैकी 2009 ची दिलेली आहे बाकी महिन्याच्या दैनंदिनी दिलेल्या नाहीत.

4. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (तेंदू) गडचिरोली वन विभाग गडचिरोली यांनी सुनावणीत असे नमूद केले की अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा दि. 9.7.2010 चा अर्ज त्यांना प्राप्त झाला तथापी त्यांच्या अर्जातील माहिती वेगवेगळया विभागाकडून प्राप्त करणे आवश्यक होते म्हणून त्यांनी आस्थापना विभाग, शिबीर लिपीक विभाग व भांडार विभाग यांचेकडून माहिती मागितली. सदरची माहिती त्वरीत पुरविण्यासाठी त्यांनी वारंवार तीनही विभागांना पत्रव्यवहार केला. तथापी त्यांचेकडून मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही. त्यानंतर तीनही विभागांकडून माहिती पुरविण्यासाठी रु. 212/— शुल्क घेणे आवश्यक आहे असे तीनही विभागांना कळविले म्हणून अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 9.8.2010 रोजी रु. 212/— शुल्क भरण्यास कळविले. तथापी अपीलकर्ता यांना माहिती देण्यास विलंब झाला म्हणून जन माहिती अधिकारी यांनी दि. 1.11.2010 रोजी अपीलकर्ता यांना विनामुल्य माहिती पुरविल्याचे सुनावणीत सांगितले. सदरची माहिती अपीलकर्ता यांना मिळालेली आहे. तथापी ती उशिरा मिळाली आणि वर नमूद केल्याप्रमाणे अपुर्ण मिळाली असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक गडचिरोली वन विभाग गडचिरोली यांचेकडे प्रथम अपील दि. दि. 9.8.2010 रोजी दाखल केले.

5. सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी श्री धारणकर यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांचे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झाले होते. त्यावर जन माहिती अधिकारी यांना तोंडी विचारणा केली असता जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना माहितीचे शुल्क भरण्यास पत्र दिले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांचेकडे शुल्क भरल्या नंतर माहिती दिली असेल असे गृहीत धरुन अपीलाची सुनावणी घेतली नाही किंवा त्याचा निर्णय दिला नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असेही नमूद केले की दि. 21.11.2009 रोजी त्यांचा अपघात झाला आणि त्यादिवसा पासून ते रजेवर होते आणि रजेवरुन दि. 5.4.2010 रोजी ते हजर झाले.

6. अपीलकर्ता आणि जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी त्यांचेकडील दि. 9.7.2010 च्या अर्जाप्रमाणे एकुण 6 मुद्यांवरती माहिती मागितली होती. मात्र त्या 6 मुद्यांपैकी मुद्या क्र. 2, 3 आणि 6 या बाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. 1.11.2010 च्या पत्राने पृष्ठ क्र. 1 ते 74 अपीलकर्ता यांना पाठविलेली आहे आणि सदरची माहिती अपीलकर्ता यांना मिळाल्याचे त्यांनी सुनावणीत कबूल केले. म्हणून वर नमूद केल्याप्रमाणे 3 मुद्यांची माहिती त्यांना दिल्याचे दिसून येते. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांचेकडील दि. 9.7.2010 च्या अर्जातील मागितलेली माहिती दि. 1.11.2010 रोजी अपुर्ण स्वरुपात दिलेली आहे. त्यालाही सुमारे 4 महिने उशिराने ही माहिती दिलेली आहे. या विलंबास जन माहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक गडचिरोली वन विभाग गडचिरोली यांनी प्रथम अपीलाचा कोणताही निर्णय दिलेला नाही. प्रथम अपील देखील त्यांचेकउे प्रलंबित ठेवले. त्यामुळे माहितीच्या अधिकाराखाली प्रथम अपीलाचा निर्णय त्यांनी मुदतीत दिलेला नाही याबाबीस प्रथम अपीलीय अधिकारी श्री धारणकर हे जबाबदार दिसून येतात. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना वर नमूद केल्याप्रमाणे ज्या 3 मुद्यांची माहिती दिलेली नाही. त्या 3 मुद्यांची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात यावी.
2) जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही आणि सुमारे 4 महिन्यानंतर अपुर्ण माहिती दिली म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 5000/– दंडाची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.
3) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक गडचिरोली वन विभाग गडचिरोली यांनी माहितीच्या अधिकाराखाली प्रथम अपीलाचा कोणताही निर्णय दिलेला नाही. यावरुन ते माहितीच्या अधिकाराचा गांभीर्याने विचार केलेला नाही असे दिसून आल्यामुळे त्यांचे विरुध्द त्यांना लागू असलेल्या सेवा नियमा प्रमाणे प्रधान मुख्य वनसंरक्षक नागपूर यांनी योग्य ती कार्यवाही करावी.

4) या निर्णयाची एक प्रत **<u>मुख्य वनसंरक्षक नागपूर</u>** यांचेकडे पोस्टाने पाठविण्यात यावी.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1092-1095

जा.क्र.—————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1377 नाग/2010**

श्री भास्कर मिठुजी डोंगरे
कस्तुरबा वार्ड (क्रिष्णापुरा) गोंदिया
(पंचशिल झेंडयाजवळ)
पो. ता. जि. गोंदिया 441601 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री नरेंद्र देवाजी बन्सोड
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष
भिमघाट स्मारक समिती, गोंदिया
मरार टोली के.ऑफ सौ.बन्सोड शिक्षिका(बटाना वाली) गोंदिया
ता. जि. गोंदिया 441614
2) जन माहिती अधिकारी तथा सचिव
भिमघाट स्मारक समिती, गोंदिया
छोटा गोंदिया पो. ता. जि. गोंदिया 441601 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.11.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून नोटीस काढून दि. 16.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी पैकी जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत मात्र प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव भिमघाट स्मारक समिती, गोंदिया छोटा गोंदिया पो. ता. जि. गोंदिया यांचेकडे माहिती अधिकारा खाली एकुण 5 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. तथापी त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी अध्यक्ष भिमघाट स्मारक समिती, गोंदिया ता. जि. गोंदिया यांचेकडे प्रथम अपील दि. 6.7.2010 रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी जन माहिती अधिकारी तथा सचिव यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज करुन एकुण 5 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. मात्र जन माहिती अधिकारी तथा सचिव यांनी त्यांच्या अर्जाचा कोणताही विचार न करता माहिती पुरविलेली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील अध्यक्ष भिमघाट स्मारक समिती, गोंदिया ता. जि. गोंदिया यांचेकडे दाखल केले. मात्र त्यावर अध्यक्षांनी म्हणजे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतला नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. तसेच सदरची संस्था पब्लीक ट्रस्ट ॲक्टखाली धर्मदाय आयुक्त यांचेकडे नोंदणी झालेली आहे असेही अपीलकर्त्यानी सांगितले.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी तथा सचिव भिमघाट स्मारक समिती, गोंदिया हे गैरहजर होते. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष भिमघाट स्मारक समिती, गोंदिया श्री नरेंद्र देवाजी बन्सोड हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की भिमघाट स्मारक समिती, गोंदिया याबाबतचे कोणतेही कागदपत्र त्यांच्याकडे ताब्यात नाही. संपूर्ण कागदपत्रे ही सचिव यांच्या ताब्यात आहेत. त्यामुळे या प्रकरणी मी कोणताही निर्णय घेण्यास असमर्थ आहे.

5. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकुन घेतल्यानंतर असे दिसून येते की भिमघाट स्मारक समिती, गोंदिया या संस्थेस शासनाचे अनुदान प्राप्त होते याबाबत कोणताही पुरावा अपीलकर्ता यांनी सुनावणीत दाखल केलेला नाही. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी खाली ही संस्था येत नाही तथापी पब्लीक ट्रस्ट ॲक्टखाली नोंदणी झाल्याचे अपीलकर्ता यांनी सांगितले म्हणून सदरच्या संस्थेची माहिती संबंधीत धर्मदाय आयुक्त यांचेकडून ट्रस्ट ॲक्टखाली उपलब्ध करुन घणे संयुक्तीक होईल म्हणून सदरचे अपील अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1097-1098

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1378 नाग/2010**

श्री वामन निळकंठ देशपांडे
एम.आय.जी.24/4, भामटी–परसोडी,
हाऊसिंग बोर्ड कॉलनी त्रिमुर्ती नगर
नागपूर 22 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री जोशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री जे. टी. रघुवंशी
जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.11.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून नोटीस काढून दि. 16.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर यांचेकडे 3 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. To whom so ever it may concern या शीर्षकाखाली 26 ऑगस्ट 2005 मध्ये नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर यांचेकडून एक प्रमाणपत्र दिले होते ते प्रमाणपत्र कोणत्या संस्थेला देण्यात आले होते व ज्या संस्थेला ते दिलेले आहे त्या संस्थेच्या अर्जाची प्रत मागितलेली दिसून येते. सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून पूर्णपणे मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर व प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी हे सुनावणीस हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा दि. 8.6.2010 चा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 24.6.2010 च्या पत्राने त्यांचेकडे जी माहिती उपलब्ध होती ती माहिती पुरविलेली आहे मात्र तिन मुद्यां पैकी मुद्या क्र. 1 व मुद्या क्र. 3 याबाबतची माहिती उपलब्ध नाही असे कळवून मुद्या क्र. 2 च्या माहितीची छायांकित प्रत अपीलकर्ता यांना पाठविण्यात आलेली आहे. माहिती पाठविल्या बाबत जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत कागदपत्रे दाखविली.

4. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की प्रथम अपीलाची सुनावणी दि. 12.7.2010 रोजी ठेवण्यात आली होती तसेच रीतसर नोटीस अपीलकर्ता यांना पाठविली होती परंतू प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी हे गैरहजर राहिले. परंतू सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की नस्तीमध्ये उपलब्ध असलेले कागदपत्र अपीलकर्ता यांना दि. 24.6.2010 रोजी दिलेली आहे. तथापी अपीलार्थी हे जी माहिती नस्तीत नाही त्या माहितीची मागणी करीत आहेत. म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी या प्रकरणातील कागदपत्रांची पाहणी केली असता जन माहिती अधिकारी यांनी दि. 24.6.2010 रोजी अपीलकर्ता यांना माहिती पाठविलेली दिसून आली. म्हणून अपील अर्ज खारीज करण्यात आल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

5. जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकुन घेतल्यानंतर असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांचेकडे असलेल्या नस्तीत जी माहिती उपलब्ध आहे ती पुरविण्यात आली म्हणजे प्रमाणपत्राची प्रत पुरविण्यात आली. मात्र ते प्रमाणपत्र कोणत्या संस्थेला दिला आहे व कोणत्या संस्थेचा अर्ज होता याची माहिती नस्तीत नसल्यामुळे ती देता आली नाही. म्हणून जी माहिती नस्तीत उपलब्ध आहे ती अपीलकर्ता यांना पुरविलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1099-1100

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1356 नाग/2010**

डॉ. सौ. शालिनी मुनिन्द्र साखरकर(शालिनी फुलमाळी)
भालेराव विज्ञान महाविद्यालय, सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री प्रदिप आठवले
प्रथम अपीलीय अधिकारी
भालेराव विज्ञान महाविद्यालय, सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर
2) श्री मिलींद बरवटे
जन माहिती अधिकारी
भालेराव विज्ञान महाविद्यालय, सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.11.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 23.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 14.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 19.11.2010 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी भालेराव विज्ञान महाविद्यालय, सावनेर ता. सावनेर जि. नागपूर यांचेकडे एकुण 6 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 23.6.2010 रोजी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या अर्जानंतर देखील अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली दि. 23.4.2010 रोजी अर्ज करुन एकुण 6 मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यावर दि. 15.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी भालेराव विज्ञान महाविद्यालय, सावनेर यांनी असे कळविले की माहिती अर्जातील माहितीची मागणी केल्यानुसार सदरची माहिती 118 पानांची असल्यामुळे झेरॉक्स करीता येणारा खर्च रु. 118 भरावे त्यानंतर माहिती पुरविण्यात येईल. तथापी जन माहिती अधिकारी यांचे दि. 15.5.2010 चे पत्र अपीलार्थी हे सुटीवर असल्यामुळे त्यांना उपलब्ध झाले नाही. त्यांच्या सुटीच्या कालावधीत त्यांच्या अधिपत्याखालील कर्मचारी श्री तागडे यांनी अपीलकर्त्याच्या गैरहजेरीत ते डाक स्वीकारु शकत नाही असे त्यांनी लेखी दिले. त्यानंतर अपीलार्थी हे सुटीवरुन कार्यालयात हजर झाल्यानंतर त्यांना दि. 25.5.2010 रोजी प्राचार्य भालेराव विज्ञान महाविद्यालय यांचेकडून असे कळविण्यात आले की मा. उच्च न्यायालय खंडपीठ

नागपूर यांचेकडील याचिका क्रमांक 5132/2008 व 5294/2008 मधील निर्देशानुसार भालेराव विज्ञान महाविद्यालय शैक्षणीक संस्था असल्यामुळे माहितीच्या अधिकाराच्या कक्षेत येत नसल्यामुळे हवी असलेली माहिती महाविद्यालय देवू शकत नाही. त्यामुळे त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. 22.6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतू त्यानंतरही त्याची सुनावणी झाली नाही व कोणताही निर्णय त्यांना कळविण्यात आलेला नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत मांडले.

4. सुनावणीत जन माहिती अधिकारी भालेराव विज्ञान महाविद्यालय, सावनेर श्री मिलींद बरबटे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी श्री प्रदीप आठवले प्राचार्य भालेराव विज्ञान महाविद्यालय सावनेर उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की. अपीलकर्ता यांचा दि. 23.4.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचेकडे दि. 27.4.2010 रोजी प्राचार्याकडून प्राप्त झाला. त्याप्रमाणे त्यांनी माहिती संकलीत करण्यास सुरुवात केली आणि माहितीची फी भरण्याबाबत अपीलकर्ता यांना दि. 15.5.2010 रोजी पत्र दिले. तथापी सदरचे पत्र अपीलकर्ता हे सुटीवर असल्यामुळे त्यांच्या ऐवजी त्यांच्या अधिपत्याखालील कर्मचा–याकडे पाठविले. मात्र त्यांच्या अधिपत्याखालील कर्मचा–याने सदरचे पत्र स्वीकारले नाही. तथापी माहिती अधिकारी यांनी संकलीत केलेली माहिती ही साक्षांकीत करुन द्यावी म्हणून त्यांनी प्राचार्य यांना दि. 23.6.2010 रोजी कळविले. त्यावर दि. 24.6.2010 रोजी प्राचार्य यांनी माहिती अधिकारी यांना असे कळविले की माहितीचा अधिकार कायदा हा शैक्षणिक संस्थेला मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांच्या निर्णया प्रमाणे लागू होत नाही म्हणून अपीलकर्ता यांना माहिती देता येत नाही. प्राचार्य यांच्या दि. 24.6.2010 च्या पत्रातील सुचनांप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती देण्यात आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

5. प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य यांनी सुनावणीत असे सांगितले की. ते प्रभारी प्राचार्य असल्यामुळे त्यांच्या नेमणूकीतील अटीप्रमाणे महाविद्यालयातील कोणतीही माहिती देतांना व्यवस्थापनाशी चर्चा करणे आवश्यक असते म्हणून त्यांनी महाविद्यालयाचे सचिव यांच्याशी चर्चा केली. मात्र सचिवानी असे सांगितले की. शैक्षणिक संस्थेला माहितीचा अधिकार कायदा हा लागू होत नाही मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचा निर्णय आहे त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती देता येत नाही. सचिवांच्या या निर्णयाप्रमाणे प्राचार्यांनी दि. 25.5.2010 रोजी अपीलकर्ता यांना माहिती देता येत नाही असे कळविले.

6. सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकुन घेतल्यानंतर असे दिसून येते की याचिका क्रमांक 5294/2008 मध्ये मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी असा निर्णय दिलेला आहे की ज्या शैक्षणिक संस्था Bombay Public Trust Act खाली नोंदणी झालेल्या आहेत व ज्यांना शासना कडून कोणत्याही प्रकारचे अनुदान अथवा वित्तीय सहाय्य मिळत नाही अशा शैक्षणिक संस्थांना माहितीचा अधिकार कायदा हा लागू होत नाही. तथापी प्रस्तूत शैक्षणिक संस्थेस कर्मचा–याचे वेतन व भत्ते देण्यासाठी शासना कडून अनुदान प्राप्त होत आहे असे प्राचार्यांनी सुनावणीत नमूद केले. म्हणून सदरच्या शैक्षणिक संस्थेस शासनाचे अनुदान स्वरुपातील वित्तीय सहाय्य मिळत असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी हया शैक्षणिक संस्थेस लागू होतात. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 23.4.2010 च्या अर्जाप्रमाणे नमूद केलेल्या 1 ते 6 मुद्यांची माहिती व्यक्तीशः विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी 10 दिवसाचे आंत व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधावा व माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

2) जन माहिती अधिकारी यांनी वरील मुदतीत अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन न दिल्यास त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 प्रमाणे शास्तीची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1104-1105

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1414 नाग/2010**

श्री केशवराव महादेवराव ठाकरे
मु. पो. खैरी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अ. ब. पोटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त
परिमंडळ क्रमांक 2 नागपूर शहर
ता. जि. नागपूर
2) श्री वाय. एन. कुथे
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त
पाचपावली विभाग नागपूर शहर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.11.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 31.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 19.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलकर्ता हे उशिरा आल्यामुळे यांचे म्हणणे नंतर एकून घेण्यात आले. तसेच सुरुवातीस उत्तरवादी यांचे म्हणणे एकून घेण्यात आले.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त पाचपावली विभाग नागपूर शहर ता. जि. नागपूर यांचेकडे एकुण 5 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 24.8.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 16.9.2010 रोजी अपीलकर्ता यांना असे कळविले की आपण मागणी केलेल्या माहिती संदर्भात गुन्हा दाखल झाला असून सदर गुन्हा तपासावर असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (1) (ज) अन्वये माहिती पुरविता येत नाही असे कळवून प्रथम अपील फेटाळले त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 25.4.2010 रोजी माहिती अधिकाराखाली अर्ज करुन माहिती अधिकारी यांना 1 ते 5 मुद्यांवर माहिती मागितली होती. तथापी माहिती अधिकारी यांनी असे कळविले की सदरहू गुन्हयाचा तपास सुरु असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (1) (ज) अन्वये माहिती देता येत नाही. म्हणून त्यांनी दि. 24.8.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. व प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 16.9.2010 रोजीच्या पत्राने कळविण्यात येवून त्यांचे अपील फेटाळले असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त पाचपावली विभाग नागपूर शहर हे उपस्थित होते. त्यांनी असे नमूद केले की अपीलकर्ता यांचा माहिती मिळण्याबतचा दि. 25.4.2010 रोजीचा अर्ज त्यांचेकडे दिनांक 3.5.2010 रोजी प्राप्त झाला. अपीलकर्ता यांनी मागणी केलेली माहिती पोलीस आयुक्त जरीपटकाशी संबंधित असल्याने दि. 4.5. 2010 रोजी जरीपटका पोलीस स्टेशन यांना मुळ अर्जाची छायांकित प्रत पाठवून अर्जात नमूद केल्याप्रमाणे उपलब्ध माहिती सादर करणे बाबत कळविले. त्यावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन जरीपटका यांचेकडून दि. 7.6.2010 रोजी असे कळविले की अर्जदार यांनी मागणी केलेल्या कागदपत्राच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन जरीपटका येथे अपराध क्र. 88/10 कलम 419, 408, 420, 486, 488, 506, 34 भा.दं.वि. सह कलम 33 (1) आजारी औद्योगीक व वित्तीय कंपनी अधिनियमान्वये अपीलकर्ता श्री केशवराव महादेवराव ठाकरे यांचे विरुध्द गुन्हा दाखल असून सदर गुन्हयाचा तपास गुन्हा शाखा येथील पोलीस उपनिरीक्षक श्री वडस्कर यांचेकडे तपासावर आहे. सदर गुन्हयाचे तपास कामी अर्जदार यांनी मागणी केलेली सर्व कागदपत्रे केस डायरीसह जोडून मा. अतिरिक्त पोलीस आयुक्त गुन्हा यांचे कार्यालयात दि. 18.3.2010 रोजी पाठविण्यात आला. म्हणून अपीलकर्ता यांचा मुळ अर्ज जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हा नागपूर शहर यांचेकडे योग्य कार्यवाहीसाठी पाठविण्यात येवून अपीलकर्ता यांना संबंधित कार्यालयाशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घेण्याबाबत दि. 30.6.2010 रोजी त्यांचे दिनांकासह स्वाक्षरी घेवून कळविण्यात आले.

5. पोलीस उपनिरीक्षक श्री बी.एम.वडस्कर आर्थिक गुन्हे शाखा यांनी दि. 2.7.2010 रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हा नागपूर शहर यांना पत्र पाठवून सदर गुन्हा तपासावर असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (1) (ज) अन्वये माहिती नाकारण्यात यावी जेणेकरुन तपासावर विपरीत परीणाम होणार नाही असे त्यांनी कळविल्यामुळे अपर पोलीस आयुक्त गुन्हे शाखा नागपूर शहर यांचे दि. 3.7.2010 च्या पत्रान्वये अपीलकर्ता अर्जदार यांना संबंधित प्रकरणाचा अर्ज चौकशीवर असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (1) (ज) अन्वये माहिती नाकारण्यात आल्याचे पत्र पाठविले.

6. प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्रमांक 2 नागपूर शहर यांनी सुनावणीत असे सांगितले की अर्जदाराने मागणी केलेल्या कागदपत्राच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन जरीपटका येथे अपराध क्र. 88/10 कलम 419, 408, 420, 486, 488, 506, 34 भा.दं.वि. सह कलम 33 (1) आजारी औद्योगीक व वित्तीय कंपनी अधिनियमान्वये गुन्हा दाखल झालेला आहे. सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखेकडे वर्ग केल्याने गुन्हा दाखल झालेला आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरु असल्याने माहिती नाकारल्याबाबत गुन्हे शाखेकडून कळविण्यात आलेले आहे. म्हणजे अर्जदाराने मागणी केलेल्या माहिती संदर्भात गुन्हा दाखल झालेला असून गुन्हा तपासावर असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (1) (ज) अन्वये माहिती पुरविता येणार नाही. कारण त्यामुळे तपासावर परीणाम होण्याची शक्यता आहे.

7. अपीलकर्ता आणि जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी मागितलेल्या त्यांचेकडील दि. 25.4.2010 च्या माहिती अधिकारातील अर्जातील एकुण 6 मुद्यांवरती माहिती मागितली होती. तथापी पोलीस स्टेशन जरीपटका येथे अपराध क्र. 88/10 कलम 419, 408, 420, 486, 488, 506, 34 भा.दं.वि. सह कलम 33 (1) आजारी औद्योगीक व वित्तीय कंपनी अधिनियमान्वये गुन्हा दाखल झालेला असून अपीलकर्त्यावर उपरोक्त कलमान्वये आरोप लावण्यात आलेले असल्याने गुन्हेगाराचे अन्वेषण करण्यास किंवा त्यांच्यावर खटला दाखल करण्यात अडथळा निर्माण होईल या कारणाने माहिती

नाकारल्याचे दिसून येते. म्हणून प्रस्तूत प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यामुळे व गुन्हा तपासावर असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (1) (ज) अन्वये माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास नकार दिल्याची कृती संयुक्तिक दिसून येते. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे नामंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे वर नमूद केलेल्या कारणास्तव नामंजुर करण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1107-1109

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1413 नाग/2010**

श्री रमेश विश्वनाथ झाडे
मु. घोटीटोक पो. महादुला
ता. रामटेक जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
इंदिरा गांधी विद्यामंदीर, बोरी चौक पो.काचुरवाही
ता. रामटेक जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.11.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 19.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे वतीने त्यांचे चिरंजीव सुनावणीस हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक इंदिरा गांधी विद्यामंदीर, बोरी चौक पो.काचुरवाही ता. रामटेक जि. नागपूर हे गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर हे सुनावणीस हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक इंदिरा गांधी विद्यामंदीर, बोरी चौक पो.काचुरवाही ता. रामटेक जि. नागपूर यांचेकडे शाळेच्या संदर्भात एकुण 10 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 10.5.2010 रोजी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 18.6.2010 ला घेण्यात आली. त्या सुनावणीस अपीलकर्ता हजर होते मात्र जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक उपस्थित झाले नाहीत. म्हणून दि. 28.6.2010 च्या पत्रान्वये प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना अपीलकर्ता यांच्या अर्जातील मुद्या क्र. 3 मधील नमूद केलेले व उप मुद्या क्र. 2 मधील कालावधीकरीता उपलब्ध कागदपत्राच्या प्रती देण्यात याव्या असे नमूद करुन उपरोक्त माहिती 7 दिवसाचे आत संबंधिताला बोलावून प्रति उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले. अन्यथा दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल असेही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुचित केले. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या वतीने त्यांच्या मुलाने असे सांगितले की जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक इंदिरा गांधी विद्यामंदीर, बोरी चौक पो.काचुरवाही ता. रामटेक जि. नागपूर यांचेकडे

त्यांच्या वडीलांनी दि. 3.9.2009 च्या पत्रान्वये एकुण 1 ते 10 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. मात्र जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. त्यानंतर त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 28.6.2010 ला जन माहिती अधिकारी यांना 7 दिवसाचे आत माहिती देण्याबाबत आदेश देवूनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक इंदिरा गांधी विद्यामंदीर, बोरी चौक पो.काचुरवाही ता. रामटेक जि. नागपूर हे गैरहजर आहेत. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर हे सुनावणीस हजर होते. त्यांनी असे सांगितले की त्यांचेकडे अपीलकर्ता यांचे दि. 10.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल झाले होते. प्रथम अपीलाची सुनावणी त्यांनी घेतली. त्या वेळेला अपीलकर्ता हजर होते. मात्र जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. म्हणून अपीलकर्ता यांचे त्यांनी म्हणणे एकून घेवून दि. 28.6.2010 रोजी त्यांनी जन माहिती अधिकारी यांना 7 दिवसाचे आत अपीलकर्त्याला बोलावून त्यांच्या अर्जातील मुद्या क्र. 3 मधील नमूद केलेले व उप मुद्या क्र. 2 मधील कालावधीकरीता उपलब्ध कागदपत्राच्या प्रती देण्यात याव्या असे आदेश दिले.

5. अपीलकर्ता तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक इंदिरा गांधी विद्यामंदीर, बोरी चौक पो.काचुरवाही ता. रामटेक जि. नागपूर यांनी अपीलकर्ता यांचेकडील दि. 3.9.2009 च्या माहिती अधिकाराखाली मागणी केलेल्या माहितीच्या अर्जाबाबत कोणतीही गांभीर्याने दखल घेतलेली नाही तसेच त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 7 (1) प्रमाणे 30 दिवसाचे आत अपीलकर्ता यांना कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही किंवा अपीलकर्त्याला त्यांच्या माहिती अर्जाबाबत कोणत्याही प्रकारचे उत्तर देखील पाठविलेले दिसून येत नाही. तसेच अपीलकर्ता यांनी त्यांना माहिती न उपलब्ध झाल्यामुळे प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी घेतली. तथापी त्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे उपस्थित राहिले नाहीत. त्यांनी त्यांच्या समक्ष कोणत्याही प्रकारचे म्हणणे मांडले नाहीत. म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 28.6.2010 ला जन माहिती अधिकारी यांना 7 दिवसाचे आत अपीलकर्ता यांच्या अर्जातील मुद्या क्र. 3 मधील नमूद केलेले व उप मुद्या क्र. 2 मधील कालावधीकरीता उपलब्ध कागदपत्राच्या प्रती देण्यात याव्या असे आदेश दिले. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारचे कागदपत्र उपलब्ध करुन दिले नाहीत. त्याप्रमाणे आयोगा समोर आज दि. 19.11.2010 रोजी सुनावणी घेण्यात आली त्यावेळेला देखील जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. यावरुन असे दिसून येते की जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक इंदिरा गांधी विद्यामंदीर, बोरी चौक पो.काचुरवाही ता. रामटेक जि. नागपूर यांनी अपीलकर्त्याच्या माहिती अधिकाराखाली अर्जाची कोणत्याही प्रकारची दखल घेतलेली नाही त्यामुळे अपीलकर्त्याला 30 दिवसाचे आत माहिती उपलब्ध झालेली नाही. याबाबत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे दोषी आढळुन येतात. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अधिकाराखालील अर्जात नमूद केलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक इंदिरा गांधी विद्यामंदीर, बोरी चौक पो.काचुरवाही ता. रामटेक जि. नागपूर यांनी अपीलकर्त्याला विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु. 5000/– ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांनी त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1111-1113

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1359 नाग/2010**

श्री दिवाकर रामभाऊ कोरेवार
मु. कोटगल पो. पारडी
ता. जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक
भामरागड वनविभाग आलापल्ली
ता. आलापल्ली जि. गडचिरोली
2) जन माहिती अधिकारी
भामरागड वनविभाग आलापल्ली
ता. आलापल्ली जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.11.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 24.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 14.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 12.11.2010 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे सुनावणीस गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सहा.वनसंरक्षक भामरागड वनविभाग आलापल्ली ता. आलापल्ली जि. गडचिरोली हे सुनावणीस हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक भामरागड वनविभाग आलापल्ली हे देखील सुनावणीस गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. वनसंरक्षक भामरागड वनविभाग आलापल्ली ता. आलापल्ली जि. गडचिरोली यांचेकडे माहिती अधिकारा खाली 6 व्या वेतन आयोगानुसार वनपाल पदावरील वेतन निश्चिती करण्यात आली नाही याचे कारण काय याबद्यल लेखी माहिती मागितलेली दिसून येते. तसेच त्यांच्या सेवापुस्तकाच्या नोंदीच्या झेरॉक्स प्रती मागितलेल्या आहेंत. म्हणजे त्यांच्या सेवेच्या संदर्भात त्यांनी माहिती मागितलेली दिसून येते. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि. 16.8.2010 रोजी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक भामरागड वनविभाग आलापल्ली यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतर देखील त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी तथा सहा.वनसंरक्षक भामरागड वनविभाग आलापल्ली हे सुनावणीस उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत आयोगापुढे त्यांच्या कडील दि. 13.10.2010 च्या पत्रान्वये असा लेखी खुलासा केलेला आहे की अपीलकर्ता श्री डी. आर. कोरेवार वनपाल यांचा दि. 15.7.2010 चा माहितीच्या अधिकारा अंतर्गत अर्ज त्यांचेकडे दि. 22.7.2010 ला प्राप्त झाला. त्यानुसार संबंधीत कक्ष प्रमुखांना माहितीच्या अर्जाची प्रत देवून माहिती पुरविण्याबाबत कळविले होते. त्यानुसार कक्ष प्रमुखांनी त्यांना दि. 6.8.2010 रोजी कळविले की अपीलकर्ता यांची वेतन निश्चिती लवकर करण्यात येईल याबाबत तजवीज ठेवत आहोत. सदर बाबत कोणतेही हेतुपुरस्सर टाळाटाळ केलेली नसून सदरची मानीव तारीख संबंधीत वनपाल यांना उपवनसंरक्षक सिरोंचा वनविभाग येथे कार्यरत असतांना मिळालेले असल्यामुळे 6 व्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती करण्यासाठी त्यांचे सेवापुस्तक सिरोंचा वनविभागाला पाठविण्यात आलेले आहे. सेवापुस्तकात वेतन निश्चितीच्या सर्व नोंदी अद्यावत झाल्यानंतर सेवापुस्तकाच्या दुय्यम प्रतीवर त्या सर्व नोंदी घेवून सेवापुस्तकाचे दुय्यम प्रत अपीलकर्ता यांना देण्यात येईल असे कक्ष प्रमुखांनी दि. 6.8.2010 च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा सहा. वनसंरक्षक भामरागड वनविभाग आलापल्ली यांना कळविले होते. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ही वस्तुस्थिती कळविलेली दिसून येत नाही.

4. अपीलकर्ता यांच्या अर्जातील मुद्दे व जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीस उपस्थित राहून सादर केलेले लेखी निवेदन यांचे अवलोकन केल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्ता यांच्या दि. 15.7.2010 च्या माहिती अधिकारा खाली अर्जाच्या संदर्भात कोणतीही माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. वास्तविक पाहता वर नमुद केल्याप्रमाणे कक्ष प्रमुखांनी जन माहिती अधिकारी तथा सहा. वनसंरक्षक भामरागड वनविभाग आलापल्ली यांचेकडे दि. 6.8.2010 च्या पत्राने अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जाबाबतची वस्तुस्थिती कळविलेली आहे. तथापी जन माहिती अधिकारी यांनी ही वस्तुस्थिती अपीलकर्ता यांना कळविलेली नाही. तसेच आस्थापना शाखेच्या कक्ष प्रमुखांनी दि. 6.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे मुद्येनिहाय 1 ते 5 मुद्यांची माहिती तथा वस्तुस्थिती दिलेली आहे. म्हणून अपीलकर्ता यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या माहिती बाबत वस्तुस्थिती कळविणे आवश्यक होते. मात्र अशी कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी केलेली नाही. यावरुन असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दण्याच्या विलंबास सर्वस्वी जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात.

5. तसेच अपीलकर्ता यांनी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक भामरागड वनविभाग आलापल्ली यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते. मात्र सदरच्या प्रथम अपीलाची कोणत्याही प्रकारची दखल प्रथम अपीलीय अधिकारी यांनी घेतलेली नाही. प्रथम अपीलाची सुनावणी घेवून त्याचा निर्णय देणे आवश्यक होते. म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी हे माहिती अधिकाराखालील अपीलाची कोणत्याही

प्रकारची गांभीर्याने दखल घेत नाही हे सिध्द होते. म्हणून प्रधान वनसंरक्षक नागपूर यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक भामरागड वनविभाग आलापल्ली यांचे विरुध्द त्यांचे सेवा शर्तीस अनुसरुन योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे. एकंदरीत अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून जन माहिती अधिका–यांनी 15 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना माहिती अधिकाराखाली मुद्येनिहाय वस्तुस्थितीदर्शक माहिती उपलब्ध करुन द्यावी.
2) जन माहिती अधिकारी तथा सहा.वनसंरक्षक (सलग्न) भामरागड वनविभाग आलापल्ली यांनी अपीलकर्ता यांना विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) अन्वये रु. 5000/– ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी. सदरची शास्तीची वसुलीची कार्यवाही **प्रधान वनसंरक्षक नागपूर** यांनी करावयाची आहे.
3) सदरच्या निर्णयाची एक प्रत **प्रधान वनसंरक्षक नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1110-1112

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1405 नाग/2010

श्री नागो मोडकू लील्हारे
मु. पो. मुरदाडा
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री मुकेश भनात्रा
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक
गोंदिया वनविभाग गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री अश्विन ठक्कर
जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्राधिकारी
गोंदिया वनविभाग गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.11.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 18.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे सुनावणीस हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव वनसंरक्षण समिती मुरदाडा बिट रक्षक दवनीवाडा यांचेकडे दि. 12.4.2010 ला माहिती मागण्याचा अर्ज केलेला होता. त्यात वनसंरक्षण समिती व मोजणी प्रकरण गट क्र. 235 व 236 या संबंधी 1 ते 7 मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 9.6.2010 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक गोंदिया वनविभाग गोंदिया यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 8.7.2010 ला घेण्यात आली आणि अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील 1 ते 5 मुद्यांची माहिती, माहिती अधिकारी गोंदिया यांनी 7 दिवसात विनामुल्य अपीलकर्ता यांना देण्यात यावी असा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 9.7.2010 रोजी दिला. तथापी अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी माहिती अधिकारा खाली अर्ज दि. 12.4.2010 रोजी सचिव वनसंरक्षण समिती मुरदाडा बिट रक्षक दवनीवाडा यांचेकडे अर्ज केला होता. तथापी सचिव यांनी तारीख नसलेले पत्र पाठवून असे सांगितले की आपणास हवी असलेली माहिती माहिती अधिकारी तथा वनसंरक्षण गोंदिया यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी. सदरचे तारीख नसलेले सचिवाचे पत्र अपीलकर्त्यास दि. 10.5.2010 रोजी मिळाल्याचे अपीलकर्त्यानी सुनावणीत नमूद केले. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असेही सांगितले की त्यांना माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दि. 9.6.2010 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक गोंदिया वनविभाग गोंदिया यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीचे दि. 8.7.2010 चे पत्र त्यांना उशिरा मिळाले म्हणून ते दि. 9.7.2010 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे गेले असता त्या कार्यालयातील कर्मच–यानी त्यांना पोस्टने माहिती पाठविल्याचे तोंडी सांगितले.

4. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की सचिव वनसंरक्षण समिती मुरदाडा बिट रक्षक दवनीवाडा हे जन माहिती अधिकारी नाहीत. म्हणून सचिवानी अपीलकर्त्यास दि. 10.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती अधिकाराचा अर्ज करण्यास कळविले आहे. तथापी अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज न करता सरळ प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक गोंदिया वनविभाग गोंदिया यांचेकडे दि. 9.7.2010 रोजी अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी होवून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 9.7.2010 रोजी अपीलाचा निर्णय देवून जन माहिती अधिकारी यांना असे कळविले की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहिती पैकी अनुक्रमांक 6 व 7 हे माहिती नसून प्रश्न विचारलेले आहेत. अशा प्रकारचे प्रश्नाचे उत्तर देणे अपेक्षित नाही. तथापी अनुक्रमांक 1 ते 5 मुद्याची माहिती जन माहिती अधिकारी गोंदिया यांनी 7 दिवसात विनामुल्य अपीलकर्ता यांना देण्यात यावी. प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 2.11.2010 च्या पत्राने अपीलकर्ता यांना 1 ते 5 मुद्याची माहिती रजिस्टर पोस्टाने पाठविली. तथापी सदरची माहिती अपीलकर्ता यांनी स्वीकारली नाही म्हणून रजिस्टर परत आले. रजिस्टर पत्रातील माहिती पूर्णपणे नसावी असे वाटल्यामुळे स्वीकारली नाही असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत कबूल केले.

5. तथापी प्रथम अपीलाचा निर्णय दि. 9.7.2010 रोजी होवून जन माहिती अधिकारीयांनी 7 दिवसात 1 ते 5 मुद्याची माहिती पाठवावी असे आदेश केलेले होते. जन माहिती अधिकारी यांनी दि. 2.11.2010 च्या पत्राने अपीलकर्ता यांना 1 ते 5 मुद्याची माहिती रजिस्टर पोस्टाने पाठविलेली दिसते. म्हणजे 5 मुद्याची माहिती पाठविण्यास देखील 4 महिन्याचे वर कालावधी केलेला दिसून येतो. याबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे नमूद केले की प्रथम अपीलाच्या निर्णया प्रमाणे त्यांना सहाय्य करणारे लेखापाल श्री गोडबोले यांनी लवकर माहिती तयार केली नाही म्हणून

श्री गोडबोले यांच्या निष्काळजीपणाबद्यल उपवनसंरक्षक यांना कळविलेले आहे. श्री गोडबोले यांच्याकडून सदरची 1 ते 5 मुद्याची माहिती दि. 2.11.2010 रोजी मिळाली म्हणून माहिती पाठविण्यास विलंब झालेला आहे. यावरुन असे दिसून येते की माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 5 (5) मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास श्री गोडबोले हे सहाय्य करीत होते. म्हणून त्यांना सहाय्यक जन माहिती अधिकारी असे समजण्यात येवून ते माहिती उपलब्ध करुन देण्यास झालेल्या विलंबाबद्यल दोषी आढळुन येतात.

6. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की प्रथम अपीलाच्या निर्णया प्रमाणे अपीलकर्ता यांना 1 ते 5 मुद्याची माहिती रजिस्टर पोस्टाने दि. 2.11.2010 रोजी पाठविलेली दिसते. तथापी सदरचे रजिस्टर पत्र अपीलकर्ता यांनी पोस्टमनकडून माहिती अपूर्ण असेल म्हणून स्वीकारली नाही याची कबूली अपीलकर्ता यांनी सुनावणीत दिली. म्हणून अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे सहमतीने असे ठरले की दि. 19.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्राधिकारी गोंदिया वनक्षेत्र गोंदिया यांच्या कार्यालयात दुपारी 12.00 ते 2.00 या कालावधीत अपीलकर्ता यांनी प्रत्यक्ष जावून व्यक्तीशः माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्राधिकारी गोंदिया वनक्षेत्र गोंदिया यांच्या कार्यालयात अपीलकर्ता यांनी दि. 19.11.2010 रोजी दुपारी 12.00 ते 2.00 या कालावधीत व्यक्तीशः उपस्थित राहून उपलब्ध असलेली माहिती विनामुल्य प्राप्त करुन घ्यावी आणि सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसाच्या आत आणि प्रथम अपीलातील निर्णयाप्रमाणे 7 दिवसाचे आंत देखील माहिती उपलब्ध करुन न देता सुमारे 4 महिन्यानी माहिती उपलब्ध करुन दिली म्हणजे त्या झालेल्या विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे लेखापाल श्री गोडबोले हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 5 (5) मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी असे समजण्यात येवून त्यांचे विरुध्द कलम 20 (2) प्रमाणे त्यांना लागू असलेल्या सेवा नियमान्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

3) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे. त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी या निर्णयाची एक प्रत सक्षम अधिकारी यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठवावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1114-1117

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1479 नाग/2010**

श्रीमती यशोधरा रजनिश नंदेश्वर
मु. मालदुगी पो. गोठणगाव
ता. कुरखेडा जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री नरेश उगेमुगे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा वरीष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी
महिला आर्थिक विकास महामंडळ गडचिरोली
माविम महिला प्रांगण, कोटगल रोड,
एम.आय.डी.सी.एरिया,प्लॉट नं.सी1/1 गडचिरोली
2) श्री गंगाधर डोर्लीकर
जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी
महिला आर्थिक विकास महामंडळ गडचिरोली
माविम महिला प्रांगण, कोटगल रोड,
एम.आय.डी.सी.एरिया,प्लॉट नं.सी1/1 गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.12.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 8.12.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे सुनावणीस हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 13.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी महिला आर्थिक विकास महामंडळ गडचिरोली यांचेकडे माहिती अधिकारा खाली वर्ष 2003 च्या आणि सन 2004–2005 या वर्षात जिल्हाभरात प्रशिक्षणाबाबतची माहिती तसेच प्रशिक्षण खर्च इत्याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत आयोगापुढे असे सांगितले की दि. 13.7.2010 च्या माहिती अधिकारा खालील अर्जाप्रमाणे त्यांनी गडचिरोली जिल्हयात महिला आर्थिक विकास महामंडळ मार्फत ज्या योजनाखाली प्रशिक्षण दिलेले आहे त्या प्रशिक्षणाबाबतची माहिती तसेच प्रशिक्षणाचा खर्च चित्रफिती, टिप्पण्या इत्याबाबतची माहिती मागितलेली होती. मात्र त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी हे उपस्थित होते. त्यांनी असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 13.7.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचेकडे दि. 19.7.2010 ला प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही काढण्यात आली. त्यावेळी असे दिसून आले की सुमारे 3000 पानाच्या वर संपूर्ण कागदपत्रे होतात म्हणन सदरची कागदपत्रे पोस्टाने पाठवावयाचे झाल्यास अपीलकर्त्याला पोस्टाचा खर्च भरणा करणे आवश्यक आहे. म्हणून त्यांनी दि. 27.7.2010 रोजी अपीलकर्त्यास पत्र पाठवून जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पोस्टाचा खर्च भरण्यास बोलाविले. मात्र अपीलकर्ता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पोस्टाचा खर्च भरण्यास गेले नाहीत म्हणून त्यांना माहिती पाठविता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

5. दरम्यानच्या काळात अपीलकर्ता यांनी दि. 13.8.2010 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पोस्टाचा खर्च भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी अशा सुचाना अपीलकर्त्यास दिल्या असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आजच्या सुनावणीत सांगितले.

6. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने दि. 13.7.2010 च्या माहिती अधिकारा खालील अर्जात मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता माहिती फार मोठया प्रमाणात दिसून येते. तसेच जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमूद केल्याप्रमाणे सर्व माहितीची पाने सुमारे 3000 पेक्षा जास्त आहेत. म्हणून सदरची माहिती पोस्टाने पाठविण्यास फार मोठा खर्च येईल आणि पोस्टाचा खर्च हा अपीलकर्त्याला भरणे आवश्यक आहे. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे नमूद केले की अपीलकर्ता हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाल्यास त्यांना व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन देता येईल म्हणजे त्यांना पोस्टाचा खर्च भरण्याची आवश्यकता राहणार नाही. म्हणून प्रस्तूत प्रकरणी आयोगासमोर अपीलकर्ता यांनी असे नमूद केले आहे की माहितीसाठी पोस्टाचा खर्च भरण्यापेक्षा अपीलकर्ता हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. 28.12.2010 रोजी उपस्थित राहतील त्यावेळेस त्यांना व्यक्तीशः माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी दि. 28.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी. म्हणून अपीलकर्ता हे दि. 28.12.2010 रोजी कार्यालयात उपस्थित झाल्यावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सदरची माहिती त्वरीत उपलब्ध करुन द्यावी. तथापी अपीलकर्ता हे दारीद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी कागदपत्राच्या स्वरुपातील जी माहिती विनामुल्य पुरविता येणे शक्य आहे ती पुरवावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1118-1120

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1354 नाग/2010**

श्री विठ्ठलराव किसनराव बरगट
जि.पा.शाळेसमोर मु. पो. गडचांदुर
ता. कोरपना जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. डी. घाटोळे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक
महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) श्री ए. एस. डाबरसे
जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक
महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.12.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 23.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 14.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 8.12.2010 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे सुनावणीस हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ चंद्रपूर यांचेकडे माहिती अधिकारा खाली दि. 30.6.2010 रोजी बस क्र. एम एच 31 9608 मध्ये रक्कम हरविल्याची तक्रार दिली होती त्या तक्रारीवर केलेल्या चौकशीची प्रत मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्ता हे दि. 30.6.2010 रोजी बस क्र. एम एच 31 9608 मध्ये प्रवास करीत असतांना त्यांची पैशाची बॅग हरविली म्हणून त्यांनी दि. 30.6.2010 रोजी व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ चंद्रपूर यांचेकडे तक्रार केली. त्या तक्रारीच्या चौकशीची प्रत त्यांनी माहिती अधिका–याकडे मागितलेली होती. मात्र त्यांना ती माहिती मिळाली नाही. प्रथम अपील दाखल केल्यानंतर देखील त्यांना माहिती मिळाली नाही असे त्यांनी सुनावणीत सांगितले.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी तथा विभागीय वाहतुक अधिकारी हे सुनावणीस उपस्थित होते. त्यांनी असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 8.6.2010 रोजीचा माहितीच्या अधिकारा खालील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही. मात्र सदरचा अर्ज त्यांचेकडे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून दि. 14.8.2010 रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही तयार करण्यात आली आणि सदरच्या माहितीची फी रु. 17/– भरण्याकरीता अपीलकर्त्यास दि. 6.9.2010 च्या

पत्राने कळविण्यात आले. मात्र अपीलकर्त्याने माहितीची फी रु. 17/– भरणा केला नाही म्हणून त्यांना माहिती पुरविता आली नाही. तथापी अपीलकर्ता यांनी असे नमूद केले की माहिती अधिकारी यांचे दि. 6.9.2010 चे रु. 17/– माहितीची फी भरण्याबाबतचे पत्र त्यांना मिळाले नाही. म्हणून त्यांनी फी भरली नाही. सदरचे पत्र पोस्टाने अपीलकत्यास पाठविले होते असे माहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

5. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील सुनावणीत असे सांगितले की अपीलकत्याचा प्रथम अपीलाचा अर्ज त्यांचेकडे दि. 10.8.2010 रोजी प्राप्त झाला. तथापी अपीलकत्याचा दि. 8.6.2010 चा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे समजल्यावरुन त्यांनी प्रथम अपीलीतील माहितीचा अर्ज हाच माहितीचा अर्ज आहे असे गृहीत धरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. 14.8.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पाठविली असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नमूद केले.

6. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की अपीलकर्ता यांना पाहिजे असलेल्या माहितीची फी रु. 17/– भरणा करण्याचे पत्र अपीलकर्त्यास पोस्टाद्वारे प्राप्त झाले नाही म्हणून अपीलकर्ता माहितीची फी रु. 17/– भरु शकला नाही असे दिसते. तथापी अपीलकर्त्यास माहिती पुरविण्यास विलंब झाल्याने आता त्यांना विनामुल्य माहिती पुरविणे योग्य होईल. आणि सदरची माहिती विनामुल्य पुरविण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत कबूल केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहितीच्या अधिकारा खालील अर्जाची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1122-1123

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1383 नाग/2010

श्री विजय पांडुरंगजी वानखेडे
मु. पो. मोहपा
ता. कळमेश्वर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री गिरीष बन्नोरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद मोहपा
ता. कळमेश्वर जि. नागपूर
2) श्री एम. आर. कुरेशी
जन माहिती अधिकारी तथा लिपीक
नगर परिषद कार्यालय मोहपा
ता. कळमेश्वर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.11.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 30.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 16.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 12.11.2010 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी नगर परिषद मोहपा ता. कळमेश्वर जि. नागपूर यांचेकडे मोहपा नगर पालीकेकडून सुरु असलेल्या घरकुल बांधकामाच्या संबंधात नागरीक, नगर सेवक व राजकीय पक्ष यांचेकडून आलेल्या तकारीच्या सत्यप्रती उपलब्ध करुन देण्याबाबत माहिती अधिकारा खाली अर्ज केला होता. परंतू अर्जानुसार पूर्ण माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 26.8.2010 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिला. तथापी अपीलकर्ता यांना पूर्ण माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी माहिती अधिकारा खाली दि. 6.7.2010 च्या अर्जानुसार मागणी केलेल्या घरकुल तक्रारीबाबत नागरीकांच्या दोन तक्रारी मिळाल्या. राजकीय पक्षाची एक तक्रार मिळाली. परंतू वार्ड क्र. 6 चे नगरसेवक श्री भिमरावजी डोंगरे यांनी दि. 1.7.2010 रोजी घरकुल योजनेबाबत जी तक्रार दिलेली आहे त्या तक्रारीची प्रत त्यांना मिळालेली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद मोहपा यांचेकडे दि. 10.8.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 26.8.2010 रोजी घेण्यात आली. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यानी त्यांचे अपील अर्ज फेटाळले. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत वार्ड क्र. 6 चे नगरसेवक श्री भिमरावजी डोंगरे यांनी दि. 1.7.2010 रोजी नगर परिषदेकडे जी तक्रार दिलेली आहे त्याची झेरॉक्स प्रत दाखविली. तथापी अपीलकर्ता यांना नगर परिषदेत दिलेल्या या तक्रारीची मुळ प्रत मागितली असता ते मुळ प्रत दाखवू शकले नाहीत.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी नगर परिषद मोहपा यांनी असे सांगितले की अपीलार्थी यांचा दि. 6.7.2010 चा अर्ज दि. 7.7.2010 ला त्यांचेकडे प्राप्त झाला. अपीलार्थी यांच्या माहिती अर्जानुसार त्यांनी मागणी केलेल्या घरकुल तक्रारीबाबत नगर परिषदेकडे उपलब्ध असलेल्या तक्रारीच्या प्रती अपीलार्थीस विहित मुदतीत म्हणजे दि. 3.7.2010 ला शुल्क भरुन देण्यात आलेले आहेत. तथापी वार्ड क्र. 6 चे नगरसेवक श्री भिमरावजी डोंगरे यांचा दि. 1.7.2010 चा घरकुल योजनेबाबतच्या तक्रारीची प्रत नगर परिषदेकडे प्राप्त झालेला नाही व त्याबाबतची नोंद सुध्दा आवक जावक विभागाकडे नाही. याबाबत आवक जावक नोंदवहीची प्रत त्यांनी सुनावणीत दाखविली. म्हणून नगर परिषदेकडे जी माहिती उपलब्ध होती ती संपूर्ण माहिती अपीलकर्ता यांना पुरविली असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले

5. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी देखील सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्त्याचा प्रथम अपीलाचा अर्ज त्यांचेकडे दि. 10.8.2010 रोजी प्राप्त झाला. त्यावर दि. 26.8.2010 रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीत असे दिसून आले की अपीलार्थी यांना माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविलेली आहे. मात्र वार्ड क्र. 6 चे नगरसेवक श्री भिमरावजी डोंगरे यांचा दि. 1.7.2010 च्या घरकुल योजनेबाबतच्या तक्रारीची प्रत नगर परिषदेकडून प्राप्त झालेला नाही. नगर परिषदेचे आवक जावक नोंदवही पाहीली असता त्यामध्ये देखील नगरसेवक श्री भिमरावजी डोंगरे यांचा तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. म्हणून प्रथम अपील फेटाळलेले आहे.

6. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीपैकी नगर परिषदेकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी दि.

30.7.2010 रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. आणि ती माहिती अपीलकर्ता यांना मिळाल्याचे अपीलकर्ता यांनी सुनावणीत कबूल केले. मात्र वार्ड क्र. 6 चे नगरसेवक श्री भिमरावजी डोंगरे यांचा दि. 1.7.2010 चा घरकुल योजनेबाबतच्या तक्रारीची प्रत नगर परिषदेकडे उपलबध नाही तसेच नगर परिषदेच्या आवक जावक नोंदवही मध्ये देखील नोंद दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील फेटाळण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील फेटाळण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1123-1125

जा.क्र.—————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1425 नाग/2010**

श्री मोरेश्वर नागन्नाजी वडलकोंडावार
स्नेहबंध, आल्लापल्ली (मसाहत) ग्रामपंचायत मार्कंडा(कं.)
पो. आष्टी ता. चामोर्शी जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी
पंचायत समिती चामोर्शी
ता. चामोर्शी जि. गडचिरोली
2) श्री एफ. एच. मिसार
जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी
ग्रामपंचायत( ) पो. आष्टी
ता. चामोर्शी जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.11.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 23.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 13.2.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत(कंन्सोबा) पो. आष्टी ता. चामोर्शी जि. गडचिरोली यांचेकडे माहिती अधिकारा खाली आल्लापल्ली मसाहत हे गाव ग्रामपंचायत मार्कंडा कंन्सोबाचे क्षेत्रात 1991 पुर्वी पासून असल्याने आजवर आल्लापल्ली मसाहत गावात बरीच वस्ती वाढल्याने किती घरे व किती मतदार आहेत यांची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने ग्रामपंचायत मार्कंडा(कं.) पंचायत समिती चामोर्शी जि. गडचिरोल यांनी दि. 13.3.2010 च्या पत्राने अपीलकर्ता यांना असे कळविले की आल्लापल्ली मसाहत मधील नवीन झालेल्या घराबाबत तसेच रहिवाशी बाबतची माहिती ग्रामपंचायत मार्कंडा(कं.) कडे उपलब्ध नाही तसेच आल्लापल्ली मसाहत मधील किती मतदार आहेत याबाबतची माहिती ग्रामपंचायत मार्कंडा(कं.) कडे उपलब्ध नाही असे कळविले. या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.) पंचायत समिती चामोर्शी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या सुनावणी नंतरही त्यांना अपेक्षित असलेली माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता हे आजच्या सुनावणीत गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे एकून घेता आले नाही. तथापी आजच्या सुनावणीत ग्रामसेवक ग्रामपंचायत मार्कंडा यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांचा माहितीचा दि. 13.2.2010 चा अर्ज त्यांचेकडे दि. 17.2.2010 रोजी प्राप्त झाला. त्यानंतर अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 13.3.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास

माहिती उपलब्ध करुन दिली. त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळविले की ग्रामपंचायत मार्कंडा(कं.) येथे आल्लापल्ली मसाहत मधील नवीन झालेल्या घराबाबत तसेच रहिवाशी बाबतची माहिती ग्रामपंचायत मार्कंडा(कं.) कडे उपलब्ध नाही तसेच आल्लापल्ली मसाहत मधील किती मतदार आहेत याबाबतची माहिती ग्रामपंचायत मार्कंडा(कं.) कडे उपलब्ध नाही. सदर माहिती महसूल विभागाशी संबंधित आहे असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविलेले दिसते.

4. सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.) पंचायत समिती चामोर्शी हे देखील उपस्थित होते. त्यांनी असे नमूद केले की अपीलकर्ता यांनी प्रथम अपील त्यांचेकडे दि. 26.4. 2010 रोजी दाखल केले. परंतू अपीलाची सुनावणी दि. 26.5.2010, 19.6.2010 रोजी घेण्यात आली. आणि सदरची माहिती ग्रामपंचायत मध्ये उपलब्ध नाही याची जाणीव अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी करुन दिली असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

5. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी दि. 13.2.2010 च्या माहिती अधिकारा खालील अर्जाने मागितलेल्या माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत मार्कंडा(कं.) पंचायत समिती चामोर्शी जि. गडचिरोल यांनी त्यांचेकडील दि. 13.3.2010 च्या पत्राने वस्तुस्थितीदर्शक माहिती अपीलकर्त्यास दिली असल्याचे दिसून येते. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1127-1128

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1490 नाग/2010 व अपील क्रमांक 1491 नाग/2010**

श्री अशोक चंपत कासवटे
आर.आर.क्वार्टर क.सी–3, सिव्हील लाईन,
रामनगर चौक, रामगीरवार दारु भट्टीजवळ
चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) श्री टोनगावकर
जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.12.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 10.11.2010 रोजी नोटीस काढून दि. 14.12.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. आहेत.

2. अपीलकर्ता यांनी संपूर्ण माहिती मिळालेली आहे त्यामुळे समाधान झाले आहे. मागीतलेली संपूर्ण माहिती समाधानकारक मिळालेली असल्यामुळे दिनांक 12.10.2010 रोजीचे दोन्ही अर्ज मागे घेत आहे असे लेखी आयोगापुढे सादर केलेले असल्यामुळे सदरची दोन्ही अपीले खारीज करण्यात येत आहेत.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1129-

जा.क.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1424 नाग/2010

श्री कवडू जनार्धन येनप्रेड्डीवार
मु. पो. मूल
ता. मूल जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय मूल
ता. मूल जि. चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी
तहसिल कार्यालय मूल
ता. मूल जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.11.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 23.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हे सुनावणीस हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार मूल आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार मूल हे शिक्षक मतदारसंघाच्या दि. 23.11.2010 च्या कामानिमीत्त व्यस्त असल्यामुळे त्यांच्या वतीने श्री पठाल अव्वल कारकून तहसिल कार्यालय मूल हे सुनावणीस हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय मूल जि. चंद्रपूर यांचेकडे माहिती अधिकारा खाली दि. 31.5.2010 रोजी केलेल्या तक्रारीबाबतच्या पत्रावर कोणती कार्यवाही केली याची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 14.8.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरचे अपील प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दि. 18.8.2010 रोजी प्राप्त झाले. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत आयोगापुढे असे सांगितले की त्यांच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती मुदतीत मिळाली नाही व प्रथम अपील दाखल

केल्यानंतर माहिती मिळाली नाही तसेच प्रथम अपील तहसिलदार मूल यांचेकडे दाखल केल्यावर त्यांनी सुनावणी घेतली नाही व कोणता निर्णयही दिलेला नाही.

4. जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री पठाल अव्वल कारकून हे सुनावणीस हजर होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्ता यांचा दि. 12.6.2010 च्या माहिती अधिकारा खालील अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 14.6.2010 रोजी प्राप्त झाला. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी अर्जातील माहिती मिळण्यासाठी अव्वल कारकून (अन्न)तहसिल कार्यालय मूल यांचेकडे दि. 19.6.2010 ला पाठवून 7 दिवसात माहिती सादर करण्याचे कळविले. तथापी पुरवठा निरीक्षक यांनी माहिती मुदतीत सादर केली नाही कारण त्यांची ग्रामपंचायत निवडणूक कामाकरीता नियुक्ती असल्यामुळे त्यांना माहिती सादर करण्यास विलंब झाला आहे. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार यांनी देखील त्यांच्या लेखी निवेदनात असे नमूद केले आहे की अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा अर्ज माहिती अधिकारी यांचेकडे दि. 14.6.2010 रोजी प्राप्त झाला. परंतू अर्जात अपीलार्थी यांनी त्यांनी दि. 31.5.2010 रोजी केलेल्या तक्रार अर्जाची माहिती मागितलेली आहे म्हणून त्यांचा दि. 31.5.2010 रोजीचा तक्रार अर्ज चौकशी करण्याकरीता दि. 10.6.2010 रोजी धान्य खरेदी निरीक्षक यांचेकडे पाठविला. मात्र पुरवठा निरीक्षक यांनी मुदतीत सादर केली नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती देण्यास विलंब झालेला आहे.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की अपीलकर्ता यांचेकडील माहिती मागण्याच्या अर्जावर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी कोणतीही कार्यवाही केलेली दिसून येत नाही. तथापी तहसिलदार यांनी दि. 19.6.2010 रोजी अव्वल कारकून (अन्न)तहसिल कार्यालय मूल यांचेकडे दि. 19.6.2010 ला अर्ज पाठवून 7 दिवसात माहिती सादर करण्याचे कळविले असे दिसून येते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेला दिसून येत नाही. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार यांच्या वतीने हजर असलेले श्री पठाल अव्वल कारकून यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती धान्य खरेदी निरीक्षक यांनी दि. 13.11.2010 रोजी दिलेली असून आता ती माहिती अपीलकर्त्याला उपलब्ध करुन देण्याची तयारी त्यांनी दाखविली. म्हणून आयोगा समोर अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आणि त्याची पोच अपीलकर्ता यांनी आयोगा समोर दिली. तथापी माहिती अधिकारा खालील माहिती विलंबाने म्हणजे सुमारे 5 महिन्याने उशीरा दिलेली आहे हे स्पष्ट होते. म्हणून या विलंबास जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार हे जबाबदार दिसून येतात. तसेच प्रथम अपील तहसिलदार मूल यांचेकडे सादर दाखल झाल्यानंतर त्यांनी त्याची सुनावणी घेवून निर्णय दिलेला दिसून येत नाही म्हणून माहिती

अधिकारा खाली प्रथम अपीलाची कोणतीही दखल घेतलेली नसून तहसिलदार यांनी गांभीर्याने विचार केल्याचा दिसून येत नाही. म्हणून भविष्यात यांची पुनरावृत्ती प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार मूल यांचेकडून होणार नाही याची त्यांना समज देण्यात येत आहे. तथापी अपीलकर्ता यांना 5 महिन्याने संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार मूल यांनी अपीलकर्ता यांना विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही आणि संपूण माहिती 5 महिन्याच्या विलंबाने अपीलकर्त्याला उपलब्ध झालेली आहे या विलंबास जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार हे दोषी आढळून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे. म्हणून तहसिलदार मूल यांनी निर्णयाची एक प्रत सक्षम अधिकारी यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

Ageyord6.1131-1133

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1423 नाग/2010**

श्री कवडू जनार्धन येनप्रेड्डीवार
मु. पो. मूल
ता. मूल जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय (जमीन शाखा) चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.11.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 23.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. व उत्तरवादी जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय (जमीन शाखा) चंद्रपूर यांच्या तर्फे आणि प्रथम अपीलीय अधिकारी अपर जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्या वतीने नायब तहसिलदार जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर श्री जी. एस. खंडाळे हे हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय (जमीन शाखा) चंद्रपूर यांचेकडे माहिती अधिकारा खाली 1 ते 13 मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि. 26.6. 2010 रोजी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचेकडे दाखल केले. त्यांनी दि. 31.7.2010 रोजी निर्णय देवून अपीलार्थीस पाहिजे असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी 7 दिवसाचे आंत विनामुल्य पाठवावी असे आदेश दिले. तथापी त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती त्यांना मुदतीत मिळाली नाही. व प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा माहिती मिळाली नाही.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी (जमीन शाखा) चंद्रपूर यांच्या वतीने नायब तहसिलदार जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर श्री जी. एस. खंडाळे हे हजर होते. त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 14 जुन 2010 चा अर्ज दि. 15 जुन 2010 रोजी उपविभागीय अधिकारी चंद्रपूर यांचेकउे माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेला आहे आणि त्याची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली आहे. उपविभागीय अधिकारी चंद्रपूर यांनी सदरचा अर्ज दि. 1.7.2010 रोजी

तहसिलदार मुल यांचेकडे माहिती देण्यासाठी पाठवून त्याची प्रत अपीलकर्ता यांना पाठविल्याचे दिसते. यावरुन असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांचेकडील दि.15.6.2010 नुसार उपविभागीय अधिकारी चंद्रपूर यांना अपीलार्थीस अर्ज पाठवून माहिती परस्पर अर्जदारास देवून या कार्यालयास कळवावे तसेच अर्जदारास सुध्दा उपविभागीय अधिकारी चंद्रपूर यांचेशी संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविल्याचे दिसून येते. यावरुन असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास पाहिजे असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याचा कोणताही पाठपुरावा केल्याचा दिसून येत नाही. जर त्यांनी माहिती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला असता तर अर्जदारास माहिती देता आली असती. तसेच उपविभागीय अधिकारी चंद्रपूर यांनी सुध्दा अर्जदारास माहिती देण्याचा प्रयत्न केल्याचा दिसून येत नाही. म्हणून अपीलार्थीस माहिती मिळण्यास विलंब झालेला दिसून येतो. म्हणून भविष्यात जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी (जमीन शाखा) चंद्रपूर आणि उपविभागीय अधिकारी चंद्रपूर यांचे कडून अशा प्रकारची पुनरावृत्ती होणार नाही याची त्यांना समज देण्यात येत आहे. तथापी आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी यांच्या वतीने हजर असलेले नायब तहसिलदार श्री खंडाळे यांनी असे सांगितले की अपीलार्थीस पाहिजे असलेली माहिती तहसिलदार मूल यांचेकडे उपलब्ध झाली व त्यांनी त्यांचेकडील दि. 20.8.2010 च्या पत्राने अपीलार्थी यांना असे कळविले की त्यांच्या कार्यालयात माहिती उपलब्ध असून माहिती घेवून जावी. तथापी अपीलार्थी ती माहिती घेण्यास गेले नाहीत. तथापी अपीलार्थीनी मागितलेल्या माहितीची प्रत नायब तहसिलदार श्री खंडाळे यांचेकडे उपलब्ध असून ते आयोगासमोर सदरची माहिती अपीलार्थीस देण्याची त्यांनी तयारी दर्शविली. म्हणून आजच्या सुनावणीच्या वेळी नायब तहसिलदार श्री खंडाळे यांनी अपीलार्थीस त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती दिली आणि अपीलार्थीस माहिती मिळाल्याबाबतची पोच घेतली. सदरच्या माहिती बाबत अपीलकर्ता यांचे समाधान झाले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1133-1134

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1421 नाग/2010

श्री शंकर आत्माराम कामडिवार
मु. पो. मूल
ता. मूल जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती संगमित्रा ढोके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद मूल
ता. मूल जि. चंद्रपूर
2) श्रीमती शकुंतला न. समर्थ
जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक
नगर परिषद कार्यालय मूल
ता. मूल जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.11.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 23.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता यांच्या वतीने श्री कवडूजी जनार्दन येनप्रेडीवार यांनी अधिकारपत्र दाखल करुन अपीलकर्त्याची बाजू मांडली. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी नगर परिषद कार्यालय मूल यांचेकडे माहिती अधिकारा खाली त्यांनी दि. 9.4.2010 रोजी नगर परिषदेकडे दिलेल्या तक्रार अर्जावर काय कार्यवाही केली आहे त्याची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 18.8.2010 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद मूल यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या वतीने श्री कवडूजी जनार्दन येनप्रेडीवार यांनी असे सांगितले की त्यांनी माहिती अधिकारा खाली अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 12.6.2010

रोजी देवून अर्जदार श्री शंकर आत्माराम कामडिवार यांच्याकडील दि. 9.4.2010 च्या तक्रार अर्जावर काय कार्यवाही केली आहे याची माहिती मागितली होती. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दि. 18.8.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. त्या अपीलानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत सांगितले.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी नगर परिषद मूल आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद मूल यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांचा माहिती अधिकारा खाली दि. 12.6.2010 चा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर माहितीच्या अर्जात दि. 9.4.2010 च्या पत्रावर कार्यवाही बाबतची माहिती अपीलार्थीनी मागितली होती. तथापी अपीलार्थी यांचा दि. 9.4.2010 चा अर्ज नगर परिषदेच्या दस्तऐवजाची तपासणी केली असता आढळून आला नाही म्हणून सदरील अर्जाची प्रत उपलब्ध करुन द्यावी जेणेकरुन आपणास आवश्यक असलेली माहिती पुरविणे शक्य होईल असे अपीलकत्यास दि. 16.6.2010 च्या पत्राने कळविले होते. दरम्यानच्या काळात अपीलार्थी यांचा दि. 9.4.2010 चा अर्ज हा आरोग्य विभागाकडे परस्पर दिला असल्यामुळे त्यांच्या नस्तीत तो आढळून आला. अपीलकर्ता यांनी दि. 9.4.2010 च्या पत्रान्वये जी तक्रार केली होती ती त्यांच्या घरा समोरील पाण्याच्या नाली तुंबलेली होती त्याबद्यल होती. तथापी त्या तक्रारीवर कार्यवाही करुन नगर परिषदेने तुंबलेले पाणी वाहाते केलेले होते व ही कार्यवाही अपीलकर्ता यांच्या समक्ष झालेली होती. म्हणून अपीलकर्त्याचा हा अर्ज आरोग्य विभागाकडून नस्तीबध्द करण्यात आला होता. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दि. 18.8.2010 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद मूल यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. परंतू अपीलाची सुनावणी दि. 31.8.2010 रोजी ठेवण्यात आली होती. परंतू अर्जदार सुनावणीस हजर झाले नाही म्हणून सुनावणी होवू शकली नाही. तथापी मुख्याधिकारी नगर परिषद मूल यांनी त्यांचेकडील दि. 27.10.2010 च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना त्यांचेकडील दि. 9.4.2010 च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती दिलेली आहे.

5. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारा खालील अर्जात जी माहिती मागितलेली होती ती त्यांच्या दि. 9.4.2010 च्या साध्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची त्यांनी माहिती मागितलेली होती. सदरचा दि. 9.4.2010 चा साधा अर्ज परस्पर आरोग्य विभागाकडे गेलेला दिसून येतो. त्या तक्रार अर्जात नमूद केलेल्या तक्रारीवर नगर परिषदेने कार्यवाही देखील केलेली दिसून येते. मात्र जन माहिती अधिकारी यांना आरोग्य विभागाकडून झालेली कार्यवाही वेळीच ज्ञात झाली नाही. म्हणून माहिती देण्यास विलंबा झालेला दिसून येतो. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांचेकडील दि. 9.4.2010 च्या तक्रार अर्जावर नगर परिषदेनी केलेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने पाठवावी.
2) जन माहिती अधिकारी नगर परिषद मूल यांनी माहितीच्या अर्जात संबंधीत मागितलेल्या माहिती बाबत भविष्यात पुरेशी खबरदारी घेणे आवश्यक आहे अशी समज जन माहिती अधिकारी यांना देण्यात येत आहे.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1134-1136

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1417 नाग/2010**

सौ. वेणु तुळशिराम सोरते
138, आदिवासी सोसायटी, वृंदावन कॉलनी,
काटोल रोड पो. काटोल रोड नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री विजय धापके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्रीमती छाया इंगोले
जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.11.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 23.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. .

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे 6 व्या वेतन आयोग आदेशावर केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी त्यांना 6 व्या वेतन आयोगानुसार वित्तीय लाभ मिळाला नाही म्हणून त्यांनी दि. 23.8.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना वित्तीय लाभ न मिळाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 23.7. 2010 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे 6 व्या वेतन आयोगाप्रमाणे त्यांच्या प्रकरणात काय कार्यवाही झालेली आहे ही माहिती मागितलेली होती. मात्र त्यांना 6 व्या वेतन आयोगाप्रमाणे वित्तीय फायदे मिळाले नाहीत म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर त्यांना थकबाकीचे हप्ते मिळाले नाहीत असे त्यांनी नमूद केले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती नागपूर आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी 6 व्या वेतन आयोगाच्या आदेशावर करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती त्यांना दि. 3.8.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांनी दिलेली आहे त्या माहिती

मध्ये असे नमूद केले आहे की 6 व्या वेतन आयोगाची थकबाकी 5 हप्त्यात आपले खात्यात जमा करावयाची होती. त्यानुसार पहिला हप्ता व दुस–या हप्त्याचे देयक लेखा विभागात मंजुरीस सादर करण्यात आलेले आहेत. म्हणून आपण लेखा विभागाशी संपर्क साधावा. तथापी सुनावणीत अपीलकर्ता यांनी असे नमूद केले आहे की माहिती अधिकारी यांच्या दिनांक 3.8.2010 च्या पत्रातील माहिती नुसार त्यांनी लेखा विभागाशी संपर्क केला मात्र त्यांच्या पहिल्या व दुस–या हप्त्याचे देयक अद्यापही मंजूर झालेले नाही.

5. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांचे पहिल्या व दुस–या हप्त्याचे देयक लेखा विभागात पाठविलेले आहेत मात्र ते देयक मंजुरीसाठी मुख्य लेख व वित्त अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडून अनुदान प्राप्त झाले नाही म्हणून सदरचे देयके देता आलेले नाही. म्हणून मुख्य लेख व वित्त अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर हे देयके मंजूर करता येतील. म्हणून या देयकाबाबतची ही वस्तुस्थिती अपीलकत्याच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना मुख्य लेख व वित्त अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर 6 व्या वेतन आयोगाच्या थकबाकीची बिले मंजूरीकरीता कार्यवाही करण्यात येईल असे विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कळवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1138-1139

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1395 नाग/2010

श्री शेख सलीम शेख अकबर
इस्माईलपरा, कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक(प्राथमिक)
प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे
महाराष्ट्र राज्य, पुणे 411 001
2) श्री के. पी. देशमुख
जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी
प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे
महाराष्ट्र राज्य, पुणे 411 001 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.11.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 16.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 15.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.1.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांचेकडे शिक्षकांच्या बदलीबाबत माहिती मागितलेली दिसून येते. त्या माहिती मध्ये नगर परिषदेतून दुस–या नगर परिषदेकडे, महानगर पालिका, जिल्हा परिषदामध्ये शिक्षकांच्या बदल्या करण्याबाबतचे शासन निर्णय किंवा नियम याची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. 21.1.2010 व 24.2.2010 च्या पत्रान्वये अपीलकर्त्या माहिती दिलेली दिसते. तथापी सदर माहितीने अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून दि. 22.6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दि. 12.8.2010 ला दिला असून सदरच्या निर्णयाने देखील अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी माहिती अधिका–याकडे दि. 14.1.2010 च्या माहिती अर्जाप्रमाणे माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जानुसार माहिती अधिका–यानी दि. 21.1.2010 च्या पत्राने प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या शिक्षण नियमावली 1949 मधील नियम 40 नुसार होत असतात असे कळविले. तथापी त्या संदर्भात त्यांना शासन निर्णय हे प्राप्त झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक(प्राथमिक) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर देखील त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे त्यांनी नमुद केले.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या दि. 14.1.2010 च्या अर्जाला अनुसरुन दि. 21.1.2010 रोजी प्राथमिक शिक्षकांच्या अंतर्गत जिल्हा/नगर परिषद/महानगर पालिका बदल्याच्या अनुषंगाने मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली 1949 मधील नियम 40 नुसार कार्यवाही करण्यात येते असे अपीलकर्त्यास दि. 21.1.2010 च्या पत्राने कळविलेले आहे. तसेच या पत्रात अपीलकर्त्याला असेही कळविलेले आहे की जिल्हा/नगर परिषदा/महानगर पालिका अंतर्गत शिक्षकांच्या बदली बाबतचे अधिकार हे शिक्षण संचालक(प्राथमिक) यांना नाहीत. सदर अधिकार हे संबंधित जिल्हा/नगर परिषदा/महानगर पालिकेकडे आहेत तसेच त्यांनी असेही सांगितले की बदली बाबत कोणताही शासन निर्णय त्यांचेकडे उपलब्ध नाही.

5. आजच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने लेखी निवेदन सादर करुन नमूद केले आहे की यांना माहिती अधिका–यांनी दि. 21.1.2010 आणि दि. 24.2.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती अपीलार्थीस पुरविलेली आहे. तसेच अपीलकर्त्यास दि. 27.3.2010 व दि. 6.5.2010 रोजी अर्जदारास बदल्याच्या नियम 40 ची झेरॉक्स प्रत आणि दि. 11.6.2010 नगर परिषद संचालनालय यांचेकडील नगर परिषद आस्थापनातील कर्मचा–याच्या बदल्याबाबतच्या स्थायी निर्देशाची प्रत देखील दिलेली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगा समोर अपीलकर्त्यास पुन्हा बदली बाबतच्या नियम 40 ची झेरॉक्स प्रत तसेच दि. 11.6.2010 च्या परीपत्रकाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत केली.

6. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 21.1.2010 आणि दि. 24.2.2010 च्या पत्रान्वये शिक्षकांच्या बदली बाबत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच आयोगा समोर नियम 40 आणि दि. 11.6.2010 चे परीपत्रक अपीलकर्त्यास पुन्हा देण्यात आले आणि त्याबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1141-1143

जा.क्र.―――――――― दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

,

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1374 नाग/2010

श्री सुरेश नंदकिशोर मिश्रा
309, परदेशी तेलीपुरा, बजेरीया,
नागपूर ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णलय,
नागपूर ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णलय,
नागपूर ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.11.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 30.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 15.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 16.11.2010 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णलय, नागपूर यांचेकडे मा. जिल्हा तकार निवारण मंच केस क. 307/2008 मध्ये गठीत केलेल्या तज्ञ समितीबाबत माहिती मागितलेली दिसून येते. तथापी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 29.6.2010 च्या पत्राने सदरची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अंतर्गत नियम 8 (1बी) नुसार मा. जिल्हा तकार निवारण मंच या कोर्टाशी संबंधित असल्यामुळे माहिती पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. माहिती अधिकारी यांच्या या उत्तरामुळे अपीलकर्त्याचे समाधान झाले नसल्यामुळे त्यांनी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी तथा सिव्हील सर्जन यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील दि. 22.7.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास सदरची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 8 (1बी) नुसार देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णया विरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे सांगितले की त्यांनी माहिती अधिकारा खाली माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन मा. जिल्हा तक्रार निवारण मंच नागपूर यांचेकडील केस क्र. 307/2008 मध्ये गठीत केलेल्या तज्ञ समितीतील सदस्यांचे नावे आणि तज्ञ समितीचा अहवाल इत्यादींची माहिती मागितलेली होती. मात्र जन माहिती अधिकारी यांनी दि. 29.6.2010 च्या पत्राने आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 22.7.2010 च्या पत्राने सदरची माहिती मा. जिल्हा तक्रार निवारण मंच या कोर्टाशी संबंधित असल्यामुळे कलम 8 (1बी) अन्वये माहिती देण्यास नकार दिलेला आहे. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असे सांगितले.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांनी असे सांगितले की अर्जदाराने मागितलेली माहिती ही मा. जिल्हा तक्रार निवारण मंच नागपूर यांचेकडील केस क्र. 307/2008 शी संबंधीत असून या कोर्टाने तज्ञ समिती गठीत करुन तज्ञ समितीचा अहवाल मागितलेला होता. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम कलम 8 (1बी) अन्वये कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने मागितलेला अहवाल दुस–या व्यक्तीस प्रकट केल्यामुळे न्यायालयाचा अवमान होवू शकतो अशी तरतुद आहे. या तरतुदीला अनुसरुन जिल्हा तक्रार निवारण मंच या न्यायाधिकरणाने सदरचा तज्ञ समितीचा अहवाल मागितलेला होता. म्हणून सदरचा अहवाल हा त्या न्यायाधिकरणाकडे सादर केलेला आहे. म्हणून अर्जदारास सदरची माहिती देण्यास नकार दिलेला आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या लेखी निवेदनात असे नमूद केले आहे की जिल्हा तक्रार निवारण मंच याला न्यायाधिकरणाचा दर्जा असल्यामुळे त्यांचेकडे सादर करावयाचा अहवाल दुस–या कोणत्याही व्यक्तीस दिल्यास तो त्या न्यायाधिकरणाचा अवमान होईल म्हणून ही माहिती अपीलकर्त्यास देण्याचे नाकारलेले आहे.

5. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की मा. जिल्हा तक्रार निवारण मंच नागपूर या न्यायाधिकरणाने जिल्हा शल्य चिकीत्सक यांचेकडे एक तज्ञ समिती नेमून समितीचा अहवाल जिल्हा तक्रार निवारण मंच यांचेकडे सादर करण्याचे कळविलेले दिसून येते. तसेच तज्ञ समितीने आपसात केलेला विचारविनिमय व कागदपत्रे तपासून दिलेला तज्ञ समितीचा अहवाल हे गोपनिय असून ही माहिती रुग्णालयाशी संबंधीत मेडीकल कोड ऑफ कंडक्टच्या अंतर्गत इतरांना पुरविता येत नाही असे माहिती अधिकारी यांनी सुनावणीस सांगितले. त्यामुळे जिल्हा तक्रार निवारण मंच या न्यायाधिकरणाने तज्ञ समितीचा अहवाल मागितलेला असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम कलम 8 (1बी) प्रमाणे प्रकट करता येत नाही असे दिसून येते. कारण तो प्रकट केल्यास जिल्हा तक्रार निवारण मंच या न्यायाधिकरणाचा अवमान झाला असता असे दिसून येते. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी माहितीस नकार देण्याची कार्यवाही संयुक्तीक दिसून येते. म्हणून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1145-1147

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1327 नाग/2010

श्री गोपाल बालाजी झाडे
8 पुरोहीत लेआऊट, अंबाझरी, नागपूर
ता. जि. नागपूर 440 033 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई 32
2) श्री दहीवले
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.11.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 5.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 16.11.2010 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे त्यांच्या निलंबना पूर्वीचा व नंतरचा कालावधी आणि निलंबन कालावधीतील वेतनवाढी याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 30.7.2010 आणि 26.7.2010 रोजी माहिती पाठविलेली दिसून येते. तथापी त्या माहितीने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतर अर्जदारास पुन्हा माहिती पाठविलेली दिसून येते. मात्र त्या माहितीने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत असे सांगितले की शासनाने दि. 7.12.1996 च्या पत्राने दुग्ध व्यवसाय विभागस कळवलेले होते की अपीलकर्त्यांना वेतनवाढ महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 मधील नियम 36 आणि 39 ची पूर्तता होत असल्यास पुर्नस्थापने नंतर वेतन वाढीसाठी विहित कालावधी झाल्यानंतर वेतनवाढ अर्जीत होते असे पत्र वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार निर्गमीत करण्यात येत आहे असे नमूद केलेले

आहे. याबाबत सहाय्यक आयुक्त (लेखा) दुग्ध व्यवसाय विकास विभाग वरळी मुंबई यांनी मा. आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास यांना दि. 5.3.1998 रोजी टिपणी सादर करुन महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 मधील नियम 36 आणि 39 ची पूर्तता होत असली तर अपीलकर्त्याला वेतनवाढ देता येत नाही असे प्रस्तावित केले असता तसे नियमावलीसह चर्चा करावी अशा सुचना दिल्या होत्या. नंतर सहाय्यक आयुक्त यांनी मा. आयुक्त (दुग्ध) यांना नियमावली दाखवून वेतनवाढी देण्यात येवू नये यास दि. 21.3. 1998 रोजी मान्यता घेतली. त्याला अनुसरुन दुग्ध व्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त (लेखा) यांना माहितीच्या अधिकारात उपरोक्त नियमावलीची मागणी केली असता त्यांनी दि. 19.3.2010 रोजी कळविले की सदरील नियमावली प्रत्यक्षात अस्तित्वात नाही त्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न उदभवत नाही. म्हणून त्यांनी वित्त विभागाकडे सदर नियमावलीची प्रत मागितली. मात्र वित्त विभागाने सदरच्या नियमावलीची प्रत त्यांना उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. आणि प्रथम अपीला नंतर त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव वित्त विभाग, मुंबई यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत माहिती मिळण्याबाबत दि. 9.6.2010 रोजी अर्ज केला होता. त्या अर्जातील वित्त विभागाशी संबंधित असलेली माहिती अपीलकर्त्यास दि. 3.7.2010 च्या पत्राने कळविण्यात आलेले आहे. आणि त्या माहिती मध्ये स्पष्टपणे असे नमूद केले आहे की निलंबनाच्या अनुशंगाने वेतनवाढी देण्याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 मधील नियम 36 आणि 39 मध्ये कोणतीही सुधारणा करण्यात आलेली नाही म्हणून नियम 36 आणि 39 ची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 26.7.2010 च्या पत्राप्रमाणे अपीलकर्त्यास पुन्हा नियम 36 आणि 39 ची प्रत पाठविलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

5. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील सुनावणीत असे सांगितले की अपीलकत्याचा प्रथम अपीलाचा अर्ज त्यांचेकडे दि. 10.8.2010 रोजी प्राप्त झाला. तथापी अपीलकत्याचा दि. 8.6.2010 चा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे समजल्यावरुन त्यांनी प्रथम अपीलीतील माहितीचा अर्ज हाच माहितीचा अर्ज आहे असे गृहीत धरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. 14.8.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पाठविली असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नमूद केले.

6. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की प्रामुख्याने अपीलकर्ता यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 मधील नियम 36 आणि 39 मध्ये कोणतीही सुधारणा करण्यात आलेली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी दि. 3.7.2010 च्या पत्राने कळविलेले आहे. मात्र अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे

सांगितले की नियम 36 आणि 39 या व्यतिरीक्त वेतनवाढी देण्याबाबत इतर कोणतेही नियम नाहीत अशी त्यांना माहिती मिळण्याची आवश्यकता आहे. म्हणजे त्यांना वेतनवाढी मिळण्यास मदत होईल. म्हणजे अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 मधील नियम 36 आणि 39 या व्यतिरीक्त वेतनवाढी देण्याबाबत इतर कोणतेही नियमावली नाही असे कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 मधील नियम 36 आणि 39 या व्यतिरीक्त वेतनवाढी बाबत इतर कोणतेही नियमावली नाही अशी सुधारीत माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1145-1147

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1404 नाग/2010**

श्री राजा खान महेबुब खान
सुमित अपार्टमेंट, शनिवारी, कॉटन मार्केट
1 ला माला, सुभाष रोड नागपूर
ता. जि. नागपूर 18 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री श्री आर. एम. सोनटक्के
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक
महाराष्ट्र लधु उद्योग विकास महामंडळ, नागपूर
पंचशील सिनेमा जवळ, वर्धा रोड रामदास पेठ नागपूर 12
2) श्री एस. व्ही. जोशी
जन माहिती अधिकारी तथा सहा. व्यवस्थापक
महाराष्ट्र लधु उद्योग विकास महामंडळ, नागपूर
पंचशील सिनेमा जवळ, वर्धा रोड रामदास पेठ नागपूर 12 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.11.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 18.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी महाराष्ट्र लधु उद्योग विकास महामंडळ, नागपूर यांचेकडे गोंदिया जिल्हा व भंडारा जिल्हयातील वीटभट्टी धारक उद्योजकांच्या कोळसा वितरणासंबंधात माहिती मागितलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 28.8.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत असे सांगितले की त्यांनी महाराष्ट्र लधु उद्योग विकास महामंडळ, नागपूर यांचेकडे दि. 9.8.2010 रोजी माहितीच्या अधिकारा खाली गोंदिया जिल्हा व भंडारा जिल्हयातील वीटभट्टी धारक उद्योजकांच्या कोळसा वितरणासंबंधाने माहिती मागितलेली होती. मात्र विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली

नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. तथापी प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांना अद्यापही माहिती उपलब्ध झाली नाही.



4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या दि. 9.8.2010 च्या अर्जाप्रमाणे त्यांनी अपीलकर्ता यांना दि. 11.8.2010 रोजी पत्र पाठवून मागितलेल्या माहितीचे रु. 3000/— भरणा करण्याबाबत कळविले. सदरचे पत्र अपीलकर्त्यास दि. 14.8.2010 रोजी प्राप्त झाले. तथापी अपीलकर्ता यांनी त्यांच्या कडील दि. 16.8.2010 च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना रु. 3000/— भरण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील रेकॉर्डचे निरीक्षण करण्याची वेळ व तारीख कळवावी. रेकॉर्डचे निरीक्षण केल्यानंतर आवश्यक त्या रेकॉर्डचे फी भरण्यास तयार असल्याचे पत्र त्यांनी माहिती अधिकारी यांना कळविले. तथापी अपीलकर्त्यास या पत्रावर माहिती अधिकारी यांनी पुन्हा अपीलकर्त्यास कळविले की आपणास कागदपत्रांचे निरीक्षण करावयाचे असल्यास त्यासाठी वेगळा अर्ज करावा लागेल म्हणून आपण रु. 3000/— फी न भरल्यास अर्ज नस्तीबध्द करण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 20.8.2010 चे पत्राने कळविले.

5. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीच्या कागदपत्राची फी रु. 3000/— चा भरणा न केल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती पुरविलेली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील खारीज केले.

6. याबाबत अपीलकर्ता यांनी असे म्हटले की जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कडील दि. 11.8.2010 च्या पत्रान्वये रु. 3000/— भरण्यास सांगितले. तथापी रु. 3000/— किती पेजेसची फी आहे याबत हिशोब दिला नाही म्हणून त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे रेकॉर्डचे निरीक्षण करण्याची विनंती केली म्हणजे निरीक्षणाअंती किती कागदपत्रे होतील त्यानुसार त्यांना फी भरता येणे शक्य झाले असते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील रु. 3000/— फी भरणा करण्याबाबत सांगितले. मात्र किती कागदपत्रांची फी आहे हे काहीही कळविले नाही.

7. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास रु. 3000/— फी किती पेजेससाठी आकारलेली आहे हे कळविलेले दिसून येत नाही. तसेच अपीलकर्त्याने फी भरण्यासाठी रेकॉर्डचे निरीक्षण करण्यास कळविले होते. त्याप्रमाणे रेकॉर्डचे निरीक्षण करु दिले असते तर अपीलकर्त्यास आवश्यक ती कागदपत्रे फी भरुन उपलब्ध करुन घेता येणे शक्य होते. तथापी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास रु. 3000/— किती कागदपत्रांची फी आहे ते कळविले नाही किंवा रेकॉर्डचे निरीक्षण करु दिलेले नाही म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

3

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत यांचेकडी दि. 9.8.2010 च्या अर्जाप्रमाणे त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1149-1151

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1402 नाग/2010**

श्री शिसुपाल मोहन तांदेकर
मु. बाकेश्वर पो. इंदोरा
ता. मौदा जि. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुरेंद्र पवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्रीमती सुनंदा मुशरीफ
जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण विभाग
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.11.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 18.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे माहिती अधिकारा खाली सायकल वाटाच्या संदर्भात व वैयक्तिक लाभाकरीता प्राप्त झालेल्या प्रस्तावाची 1 ते 9 मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी अपीलकर्ता यांना दोन मुद्यांची माहिती मिळाली व 7 मुद्यांची माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. 17.8.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत असे सांगितले की त्यांनी दि. 29.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे सायकल वाटाच्या शर्ती व अटी तसेच प्रत्येक पंचायत समितीला वैयक्तिक लाभाच्या प्रस्तावाच्या प्रती अशी 1 ते 9 मुद्यांची माहिती मागितलेली होती. मात्र त्यांना दोन मुद्यांची माहिती मिळाली आणि इतर 7 मुद्यांची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून असे त्यांनी सुनावणीत सांगितले.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या दि. 29.7.2010 च्या अर्जानुसार माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये 1 ते 9 मुद्यांची माहिती मागितलेली होती. अपीलकर्ता हे बी पी एल धारक असल्यामुळे दि. 9.8.2010 च्या पत्रान्वये बी पी एल चे मुळ प्रमाणपत्रसह तसेच माहिती मोठया प्रमाणात असल्यामुळे दि. 16.8.2010 रोजी कार्यालयात निरीक्षणास हजर राहण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्यानुसार अपीलकर्ता हे दि. 16.8.2010 रोजी कार्यालयात निरीक्षणास हजर झाले परंतू त्यांनी निरीक्षण केले नाही. मात्र कार्यालयात लेखी माहिती देण्याबाबत पुन्हा पत्र दिले. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी दि. 18.8.2010 अन्वये माहिती मोठया प्रमाणात असल्यामुळे निरीक्षणा करीता व काही माहिती दि. 27.8.2010 ला अपीलकर्त्याला घेवून जाण्याबाबत पत्र दिले आणि त्यांनी माहिती न नेता दि. 17.8.2010 ला प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 13.9.2010 रोजी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार अपीलकर्त्याला दि. 30.9.2010 अन्वये पोस्टाद्वारे सुमारे 553 पानाची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. असे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती मोठया प्रमाणात आहे. त्यासाठी अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना निरीक्षणा करीता कार्यालयात बोलाविले होते. तथापी अपीलकर्ता हे कार्यालयात गेले नाहीत. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर अपीलकर्त्यास दि. 30.9.2010 च्या पत्राने सुमारे 553 पानाची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने पाठविलेली दिसते. तथापी या पाठविलेल्या माहिती व्यतीरीक्त आणखी जी माहिती उपलब्ध होईल ती माहिती अपीलकर्त्यास पुन्हा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दि. 30.9.2010 च्या पत्राने पाठविलेल्या माहिती व्यतीरीक्त जी माहिती उपलब्ध होईल ती रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1153-1154

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1445 नाग/2010**

श्री विजय उमराव डोंगरे उर्फ डोंगरवार
वार्ड क. 3(पंचशील झेंडा चौक)
मु. पो. कटंगीकला ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री गोगुलवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री ए. सी. राणे
जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत कटंगीकला
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.11.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 26.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 25.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 28.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत कटंगीकला यांचेकडे सन 2007–08 व 2008–09 या वर्षामध्ये बोलविलेल्या ग्रामसभेला हजर राहण्याकरीता प्रत्येक ग्रामसभा सदस्याना कळविल्याची तारीख, वेळ व ठिकाण कळविल्याबाबत त्याच्या पोच पावत्या मागितलेल्या दिसून येतात. तथापी अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 19.7.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 12.8.2010 रोजी घेण्यात आली. व निर्णय दि. दि. 12.8.2010 रोजीच झाला. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे त्यांना मतदार यादी मिळाली मात्र उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत असे नमुद केले की मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 54 ग (2) अन्वये प्रत्येक ग्रामपंचायतला ग्रामसभा बोलाविणे आवश्यक असते व त्या सभेसाठी गावातील सदस्यांना बोलाविण्यासाठी सभेची तारीख, वेळ व ठिकाण कळवावे लागते. त्यानुसार सन 2007–08 व 2008–09 मध्ये या ग्रामसभेचा तपशिल त्यांनी मागितलेला होता. मात्र त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी गोंदिया हे सुनावणीस उपस्थित होते. जन माहिती अधिकारी

यांनी सुनावणीत असे सांगितले की सन 2007–08 व 2008–09 या वर्षामध्ये मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 54 ग (2) अन्वये प्रत्येक ग्रामसभेत हजर राहण्याकरीता प्रत्येक ग्रामसभा सदस्यांना वैयक्तिक नोटिसीद्वारे कळविण्यात येत नाही तथापी सर्व वार्डात व गावात दवंडी द्वारे तसेच मुख्य चौका चौकात नोटिस लावून ग्राम सभेची तारीख, वेळ व ठिकाण या माध्यमातून कळविण्यात येते. तसेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियमान्वये अद्यावत असलेली ग्रामसभा सदस्यांची यादी (कर खातेदार) अपीलकर्त्यास दि. 24.6.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे.

5. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी यांनी दि. 24.6.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी ग्रामपंचायत कटंगीकला येथील मतदार यादी अपीलकर्त्यास पुन्हा पुरवावी असे माहिती अधिकारी यांना आदेश देवून दि. 12.8.2010 रोजी कळविण्यात आले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर अपीलकर्त्यास माहिती अधिकारी यांनी मतदार यादी देखील पुरविली. सदरची मतदार यादी अपीलकर्त्यास मिळाल्याबद्यल सुनावणीत त्यांनी सांगितले.

6. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 24.6.2010 नुसार माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच ग्रामसभेची मतदार यादी देखील उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसून येते. आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाली असल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत कबूल केले. म्हणून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1156-1157

जा.क्र.––––––––– दि.................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1441 नाग/2010

श्री रमेश बोंदीजी संतोषवार
शेन्डे प्लॉट, शिवमंदिर जवळ, रामनगर
चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर 442 401 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक
भूमी अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त(भूमापन) पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवनसमोर,
पुणे 411 001
2) जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवनसमोर,
पुणे 411 001
3) जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
भूमी अभिलेख, चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.11.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 26.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 25.11.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख पुणे (म.रा.) यांचेकडे माहिती अधिकारा खाली अर्ज करुन एकुण 1 ते 20 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत असे सांगितले की त्यांनी दि. 10.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख पुणे (म.रा.) यांचेकडे माहिती अधिकारा खाली अर्ज करुन एकुण 1 ते 20 मुद्यांवर माहिती

मागितलेली होती. तथापी माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. 5.7.2010 रोजी कळविले की त्यांचे काही माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध आहे व काही माहिती उपलब्ध नाही म्हणून त्यांनी त्यांच्या कार्यालयात निरीक्षणाकरीता अपीलकर्त्याला बोलाविले. तथापी त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून यांनी दि. 10.7.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. त्याची सुनावणी दि. 18.8.2010 रोजी ठेवण्यात आली होती. तथापी त्या सुनावणीस ते उपस्थित राहू शकत नसल्यामुळे त्यांनी सुनावणीची पुढची तारीख मागितली होती परंतू पुढची तारीख न देता त्याचे प्रथम अपील दि. 21.8.2010 रोजी फेटाळण्यात आले आहे म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असे अपीलकर्त्यांनी सुनावणीत सांगितले.

4. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक भूमी अभिलेख, चंद्रपूर यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज पुण्याच्या मुख्य कार्यालयाकडून त्यांच्या कार्यालयास दि. 14.5.2010 रोजी प्राप्त झाला. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 5.7.2010 रोजी 1 ते 20 मुद्यांबाबतची वस्तुस्थितीदर्शक माहिती पुरविण्यात आली. आणि जी माहिती त्यांच्ये कार्यालयात उपलब्ध होती ती देण्यात आली. मात्र त्याशिवाय त्यांच्या कार्यालयात अपीलकर्त्यास उपलब्ध असलेली माहिती निरीक्षणाकरीता बोलविण्यात आले त्यासाठी दि. 16.7.2010 रोजी त्यांना निरीक्षणाचा वेळ देण्यात येवून त्यांनी निरीक्षण करुन त्यांना पाहिजे असलेल्या दस्तऐवजाची फी भरल्यानंतर त्यांना माहिती पुरविण्यात येईल असे देखील माहिती अधिकारी यांनी कळविले होते. मात्र अपीलकर्ता हे माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. 16.7.2010 रोजी अभिलेखाचे निरीक्षण करण्यास आले नाहीत असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

5. तथापी याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी रेकॉर्डचे निरीक्षणाची मागणी केली नव्हती त्यामुळे जे रेकॉर्ड उपलब्ध आहेत त्याची फी त्यांना कळविली असती तर त्यांनी ती त्वरीत भरली असती परंतू माहिती अधिकारी यांनी फी कळविली नाही म्हणून मला मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही असे अपीलकर्ता यांनी सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 5.7.2010 च्या पत्रान्वये माहितीच्या अधिकाराखाली माहितीबाबत उत्तर पाठविले असून अपीलकर्त्याला रेकॉर्डच्या निरीक्षणासाठी कार्यालयात बोलाविले असून निरीक्षणानंतर फी चा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले आहे. वास्तविक पाहता माहिती अधिकारी यांनी जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे त्याची फी आणि टपाल खर्च अपीलकर्त्यास कळविणे आवश्यक होते. मात्र माहिती अधिकारी यांनी माहितीची फी आणि टपाल खर्च कळविलेले दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्त्याला माहिती उपलब्ध झालेली नाही. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1159-1161

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**